सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

# “ संविधान गौरव महोत्सव ”




## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण)

## पुणे विभाग, पुणे

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही,** भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

# अनुक्रमणिका

**१. प्रास्ताविक**

**२. मनोगत**

**३. संविधान गौरव महोत्सवा अंतर्गत सहभागी विद्यापीठे व महाविद्यालये**

i) पुणे शहर

ii) पुणे ग्रामीण

iii) अहिल्यानगर

iv) नाशिक

v) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

vi) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

vii) डेक्कन अभिमत विद्यापीठ, पुणे

viii) गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे

**४. समारोप**

# प्रास्ताविक



**डॉ.अर्चना बोऱ्हाडे**
**प्रशासन अधिकारी ,उच्च शिक्षण,**
**पुणे विभाग, पुणे.**

भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ म्हणजे आपले संविधान. हे संविधान देशाच्या सर्व नागरिकांना समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी देते. संविधान निर्मितीच्या गौरवशाली आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि लोकशाहीच्या मुल्यांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी दरवर्षी संविधान दिन केला जातो. भारतीय राज्यघटनेचा मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारण्यात आला. या घटनेला २६ नोव्हेंबर २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन २६ जानेवारी २०२५ रोजी या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. यापार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांत "संविधान गौरव महोत्सव"या उपक्रमांचे आयोजन महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण विभागाद्वारे करण्यात आले होते.

पुणे शहर, पुणे ग्रामीण,अहिल्यानगर, नाशिक विभाग,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ,डेक्कन अभिमत विद्यापीठ, गोखले गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव या उपक्रमांतर्गत भारतीय राज्यघटनेतील व्याख्याने, चर्चासत्रे, प्रश्नमंजुषा, निबंध व वकृत्व स्पर्धा संविधानाबद्दल जनजागृत, पथनाट्ये यासारखे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वच जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, महाविद्यालयीन समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी विकास

अधिकारी, या उपक्रमात सहभाग घेतलेले सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचे मी प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण विभाग या  या नात्याने आभार मानते आणि सर्वांना भारतीय संविधान अमृत महोत्सवाच्या शुभेच्छा देते.

मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडील पत्र क्र. ससं/ उशि/ पुवि/ संकीर्ण/ परिपत्रक/ २०२५/४१८२९८३ दिनांक १२/०२/२०२५ अन्वये अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त “संविधान गौरव महोत्सव” या उपक्रमांतर्गत दिनांक १७/०२/२०२५ ते २८/०२/२०२५ या दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचा संक्षिप्त अहवाल सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

**धन्यवाद...**

**(डॉ. अर्चना बोऱ्हाडे)**

# मनोगत



**डॉ. अशोक उबाळे**
**सहसंचालक, उच्च शिक्षण,**
**पुणे विभाग, पुणे-०१**

भारतीय राज्यघटनेचा मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारण्यात आला. या घटनेला २६ नोव्हेंबर २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन २६ जानेवारी २०२५ रोजी या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. भारताच्या याऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी फेब्रुवारी २०२५ मध्ये महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण विभागाद्वारे महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांत **"संविधान गौरव महोत्सव"** या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय संविधान हा आपल्या देशाचा आत्मा व लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. भारतीय संविधान हे आपल्या देशाच्या इतिहासाचे, संस्कृतीचे आणि मूल्यांचे प्रतीक आहे. ते आपल्याला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यांसारख्या महत्त्वाच्या मूल्यांची शिकवण देते. संविधानामुळे आपले राष्ट्र एक मजबूत आणि समृद्ध म्हणून ओळखले जाते.

संविधान गौरव महोत्सवाचा मुख्य उद्देश लोकांना संविधानाबद्दल शिक्षित करणे आणि त्यांच्यात जागरूकता निर्माण करणे हा आहे. हा उत्सव आपल्याला संविधानाचे महत्त्व आणि त्याचे पालन करण्याचे महत्त्व सांगतो. संविधान गौरव महोत्सव देशभरात विविध स्तरांवर आयोजित केला जात आहे.

सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे. या विभागाच्या अधिनस्त अकृषि विद्यापीठे व शासकिय / अशासकिय महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव या उपक्रमांतर्गत भारतीय राज्यघटनेवर व्याख्याने, चर्चासत्रे, प्रश्नमंजुषा, निबंध व वकृत्व

स्पर्धायासारखे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विभागातील सर्व अधिनस्त अकृषि विद्यापीठे वशासकिय/अशासकिय महाविद्यालयातील प्राचार्य, महाविद्यालयीन समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी विकास अधिकारी, या उपक्रमात सहभाग घेतलेले सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी व विद्यार्थिनीयांचे मी अभिनंदन करतो.

सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांत "संविधान गौरव महोत्सव" या उपक्रमांचे आयोजन महाराष्ट्र शासन ,उच्च शिक्षण विभागाद्वारे करण्यात आले होते. उपक्रमाची यशस्वीपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे ची निवड करून आमच्यावर जो विश्वास दाखविला त्याबद्दल मी प्रथमत्यांचे आभार मानतो.

मा. संचालनालयाचे परिपत्र क्र उशिसं/मवि-1/संविधान गौरव महोत्सव/२०२५ /३५६ अ, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ च्या परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार फेब्रुवारी २०२५ मध्ये संपुर्ण महिनाभर भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त **"संविधान गौरव महोत्सव"** या उपक्रमांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले त्याचा संक्षिप्त अहवाल सहसंचालक, (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे या विभागाचा सादर करताना मला विशेष आनंद होत आहे.

**धन्यवाद...**

**(डॉ. अशोक उबाळे)**

# संक्षिप्त सांख्यिकीय अहवाल

मा. संचालनालयाचे परिपत्र क्र उशिसं/मवि-1/संविधान गौरव महोत्सव/२०२५/३५६ अ, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ च्या परित्रकात नमूद केल्यानुसार पुणे विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे यांचे अधिनस्त असलेल्या विद्यापीठे, महाविद्यालयांची माहिती जिल्हानिहाय नियुक्ती प्राचार्य व समन्वयकांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये संपुर्ण महिनाभर भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त **"संविधान गौरव महोत्सव"** या उपक्रमांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले त्याचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे.

| **भारतीय राज्यघटना विषय तज्ञांची व्याख्याने, निबंध व वकृत्व स्पर्धा, प्रश्न मंजुषा, पोस्टर /भित्ती पत्रके स्पर्धा, संविधान जनजागृती** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विभाग** | **विभागातील जिल्हे** | **विद्यापीठ/ महाविद्यालयाची संख्या** | **उपक्रमात सहभागी विद्यार्थी संख्या** |
| 01 | पुणे विभाग | पुणे शहर | २८ | २३६८ |
| 02 | | पुणे ग्रामीण | २५ | २१०० |
| 03 | | अहिल्यानगर | ३६ | २०८६ |
| 04 | | नाशिक | ३८ | २७०५ |
| 05 | | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | ०१ | ३२६ |
| 06 | | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे | ०१ | १२९ |
| 07 | | डेक्कन अभिमत विद्यापीठ | ०१ | ११० |
| 08 | | गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स | ०१ | १२३ |

# विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे

विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे येथे कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून झाली. संविधानाच्या मूलभूत तत्त्वांची जाणीव करून देणे आणि संविधान व नागरिक यांच्यातील नाते अधिक दृढ करणे हा यामागे उद्देश होता.

डॉ.अशोक उबाळे, सहसंचालक ,उच्च शिक्षण, पुणे विभाग, यांनी विभागातील सर्व सहकारी आणि कर्मचाऱ्यांच्या समवेत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून त्याबाबाबत मार्गदर्शन केले. संविधानात समाविष्ट असलेल्या मूल्यांबद्दल विद्यार्थी आणि प्राध्यापकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, भारताच्या लोकशाही चौकटीला आकार देण्यासाठी न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाचा आदर निर्माण करणे. या हेतूने पुणे शहर विभाग, पुणे ग्रामीण विभाग, अहिल्यानगर विभाग, नाशिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, डेक्कन अभिमत विद्यापीठ, पुणे, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे, येथील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये संविधान गौरव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे स्पष्ट केले.



**अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर पुणे** यांनी संविधान गौरव महोत्सवा निमित्त वेगवेगळया कार्यक्रमांचे आयोजन खालील प्रमाणे केले.

शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयात 'वक्तृत्व स्पर्धा' आयोजित केली होती. सदर स्पर्धेत एकूण १८ स्पर्धकांनी भाग घेतला होता.

विषय - 'भारतीय राज्यघटनेची ओळख' असा होता. भारतीय राज्यघटनेची ओळख या विषयावर निबंध स्पर्धा त्यांनी घेतली.







**श्री शिवाजी मराठा सोसाटीच्या अध्यापक महाविद्याल अरण्येश्वर, पुणे-०९** यांच्यावतीने ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पधेचे आयोजन करण्यात आलेचा मुख्य उदेश संविधानविषयी जनजागृती करणे आणि त्याचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देणे हा होता.

या स्पर्धेत बहुपर्यायी प्रश्न विचारण्यात आले ज्यामध्ये संविधानाच्या विविध घटकांवर आधारित प्रत्रांचा समावेश करण्यात आला सहभागी स्पर्धकांनी दिलेल्या लिंकवर जाऊन प्रश्नांची उत्तरे ऑनलाइन स्वरुपात दिली. यामध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि अभ्यासकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला.

**आदर्श कॉम्प्रिहेन्सिव्ह कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे** यांनी खालील उपक्रमांचे आयोजन केले:

• भारतीय संविधान आणि त्याच्या निर्मात्यांचे महत्त्व साजरे करण्यासाठी.

• संविधानात समाविष्ट असलेल्या मूल्यांबद्दल विद्यार्थी आणि प्राध्यापकांना मार्गदर्शन करणे.



• भारताच्या लोकशाही चौकटीला आकार देण्यासाठी न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाचा आदर निर्माण करणे.

कार्यक्रमाचा सारांश:

२६ नोव्हेंबर २०२४ रोजी, आदर्श कॉम्प्रिहेन्सिव्ह कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे यांनी अनेक अभ्यासपूर्ण सत्रे आणि सादरीकरणांच्या मालिकेद्वारे भारतीय संविधान दिन साजरा केला. देशात लोकशाही मूल्यांचे समर्थन आणि जतन करण्यात भारतीय संविधानाची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

डॉ. पद्मजा कस्तुरे यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यांचा विवेचनामुळे , संविधानात समाविष्ट असलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाच्या मूल्यांची आठवण झाली.

प्रस्तावनेनंतर, डॉ. जोशी यांनी संविधानाने हमी दिलेल्या मूलभूत हक्कांवर विस्तृत भाषण दिले. त्यांनी वैयक्तिक स्वातंत्र्यांचे संरक्षण आणि समानता सुनिश्चित करण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली, हे अधिकार भारतात सामाजिक सुसंवाद आणि न्याय कसा राखतात यावर भर दिला. अवंतिका यांनी भारतीय संविधानाच्या प्रमुख वैशिष्ट्यांवर सविस्तर भाषण दिले. त्यांनी त्याची रचना, कार्ये आणि त्याच्या निर्मितीमागील ऐतिहासिक संदर्भांवर चर्चा केली, देशाच्या संवैधानिक चौकटीबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी दिली. श्री. अरुण यांचे सत्र भारतीय संविधानाच्या उत्पत्तीवर, त्याचे निर्माते आणि भारताच्या लोकशाही व्यवस्थेला आकार देण्यातील त्याची महत्त्वपूर्ण भूमिका यावर केंद्रित होते. त्यांचे सादरीकरण शैक्षणिक आणि प्रेरणादायी दोन्ही होते, जे देशाच्या विकासावर संविधानाचा खोलवर होणारा प्रभाव अधोरेखित करते. डॉ. भिसे यांनी विचारप्रवर्तक भाषण दिले.




शासन, कायदेशीर व्यवस्था आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण यासाठी मार्गदर्शक दस्तऐवज म्हणून संविधानाचे महत्त्व काय आहे याबद्दल माहिती दिली. त्यांच्या चर्चेतून समकालीन भारतातील संविधानाच्या प्रासंगिकतेवर अधिक भर देण्यात आला.

या कार्यक्रमात अश्विनी यांनी एक भावपूर्ण संगीत सादरीकरण देखील केले, संविधानाचे सार आणि राष्ट्राला एकत्र आणण्यात त्याची भूमिका मांडणारे देशभक्तीपर गीत सादर केले. कार्यक्रमाची सांगता प्रतिक्षा यांच्या चिंतनशील भाषणाने झाली, संविधान नागरिकांना न्याय, समानता आणि समृद्धीकडे कसे प्रेरित करत आहे यावर भाष्य केले. त्यांच्या प्रभावी शब्दांनी संविधानात समाविष्ट असलेल्या मूल्यांचा आदर आणि समर्थन करण्याचे महत्त्व लक्षात आणून दिले.

डॉ. उल्का अमले यांच्या आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाचा शेवट झाला, त्यांनी या उत्सवाच्या यशात योगदान दिल्याबद्दल सर्व सहभागी आणि उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाचे निष्कर्ष:

भारतीय संविधानाच्या निर्मात्यांना हा कार्यक्रम एक योग्य अभिवादन होते , ज्यामध्ये भारताची व्याख्या करणाऱ्या लोकशाही तत्त्वांचे रक्षण करण्यात त्याचे महत्त्व अधोरेखित झाले. विद्यार्थी आणि प्राध्यापकांना शासन, कायदेशीर व्यवस्था आणि वैयक्तिक हक्कांच्या संरक्षणात संविधानाच्या भूमिकेची सखोल समज मिळाली. या कार्यक्रमामुळे सर्व उपस्थितांमध्ये भारतीय संविधानाबद्दल अभिमान आणि आदराची भावना निर्माण झाली आणि त्यांना ती ज्या मूल्यांचे प्रतिनिधित्व करते ते जपण्याची प्रेरणा मिळाली.



पुणे-३० येथील **टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनने** संविधान दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला. डॉ. राधिका इनामदार या कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या. डॉ. चंदन शिंगटे हे समन्वयक होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋग्वेद गोसावी यांनी केले.यावेळी बी.एड. प्रथम वर्षाचे विद्यार्थी होते. त्यांनी सर्व मान्यवर आणि विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला आणि संविधानाच्या प्रतीला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. डॉ. चंदन शिंगटे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. राधिका इनामदार यांनी संविधानाची प्रस्तावना वाचली आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या पाठोपाठ भाषण केले. अनोमा सूर्यवंशी, विनायक राठोड या बी.एड. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी संविधानावर आपले विचार मांडले. श्रावणी यांनी संविधानावर एक कविता



वाचली. अध्यक्षीय भाषणात डॉ. इनामदार यांनी सद्य सामाजिक परिस्थिती आणि संविधानाबद्दल आपले विचार मांडले. त्यांनी व्हिडिओद्वारे देखील आपले विचार मांडले. प्रथम वर्षाच्या बी.एड. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी साक्षी डागा हिने आभार मानले. बी.एड. आणि एम.एड. प्राध्यापकांसह ५० विद्यार्थी उपस्थित होते. अशाप्रकारे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

**एस.एन. डी. टी. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे** यांनी दि.१७-२-२०२५ रोजी भारतीय



संविधान जाणीव जागृती कार्यक्रम कुडजे गाव येथे साजरा केला. संविधान विषयी जनजागृती होण्यासाठी विद्यार्थिनीकडून स्लोगन तयार करण्यात आले. त्या घोषणा सादर करत संविधान जनजागृती पदयात्रा कुड्जे गाव येथे काढण्यात आली. विद्यार्थिनींनी पथनाट्य सादर केले व लोकांना संविधानाचे महत्व पटवून देण्यात आले. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफ. डॉ. संगीता शिरोडे व एनएसएस प्रोग्राम ऑफिसर डॉ. विजय चव्हाण यांचे सहकार्य मिळाले. कार्यक्रमाचे



नियोजन डॉ. सारिका बहिरट, सहसमन्वयक व वर्षा वर्मा यांनी केले. या उपक्रमात एकूण ३६ विद्यार्थीनी सहभागी होत्या.

**भारती विद्यापीठ,पुणे येथील (विद्यापीठ अभिमत) दंत महाविद्यालयाच्या** एनएसएस युनिटने व्याख्यानाचे आयोजन केले. भारताच्या संविधानाच्या ७५ व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने




२४ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे येथील भारती विद्यापीठाचे दंत महाविद्यालय आणि रुग्णालय येथे हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. भारती विद्यापीठ, विधी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. ज्योती धरम यांना अतिथी वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांना "भारताच्या संविधानाचा परिचय" या




विषयावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमाला ६० विद्यार्थी आणि महाविद्यालयीन प्राध्यापक उपस्थित होते.

सिम्बायोसिस कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सने कॉलेजच्या सभागृहात "तुमचे संविधान जाणून घ्या: संविधान@७५" या विषयावर तज्ज्ञ व्याख्यात्यांच्या सत्राचे आयोजन केले होते. या सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्राध्यापक श्रीरंजन आवटे उपस्थित होते,प्रा.श्रीरंजन आवटे हे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, लेखक आणि स्तंभलेखक आहेत.

यावेळी विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाची प्रस्तावना वाचली. तिच्या प्रभावी भाषणाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आणि राष्ट्राला एकत्र बांधणाऱ्या लोकशाही मूल्यांना पुन्हा एकदा पुष्टी दिली.

प्राध्यापक आवटे यांच्या सत्राची सुरुवात विद्यार्थ्यांसाठी एका आकर्षक कोडी सोडवून झाली, जी भारतीय संविधानाच्या मुख्य तत्त्वांवर अखंडपणे चर्चेत रूपांतरित झाली. त्यांनी

स्वातंत्र्य, समानता आणि समता यासारख्या प्रमुख संकल्पना सादर केल्या, या सदर करताना त्यांनी विनोद, रूपके आणि किस्से यांचा वापर केला. एक उल्लेखनीय संदर्भ म्हणजे पंडित नेहरूंचा स्व-अभिव्यक्तीच्या महत्त्वावर भर देणारामुद्दा . त्यांनी भारतीय लोकांप्रती संविधानाच्या समर्पणावर भर दिला.




या सत्रात स्पर्धेपेक्षा सहकार्याची भारतीय मूल्ये, धर्मनिरपेक्षतेचे महत्त्व आणि सार्वत्रिक प्रौढ मताधिकारासह देशाचा इतिहास यांचा शोध घेण्यात आला, भारतीय लोकशाहीमध्ये महिलांच्या भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला. प्राध्यापक आवटे यांनी संविधानात कल्याणकारी मॉडेलच्या समावेशावर चर्चा केली, संतुलित शक्ती आणि सामाजिक न्यायाची गरज यावर भर दिला.




अर्थशास्त्रात खोलवर जाताना, त्यांनी भांडवलशाही, समाजवाद आणि वंचित समुदायांप्रती राज्याची जबाबदारी यांचा शोध घेतला. त्यांनी व्यापक तात्विक चर्चेत संविधानाला "मोहब्बत की दास्तान" या संकल्पनेशी जोडणारा एक हलकाफुलका किस्सा देखील सांगितला. सत्र पुढे सरकत असताना, प्राध्यापक आवटे यांनी आत्म-जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित केले, वांशिकता, परकीय द्वेष आणि धर्मांधतेविरुद्ध सावधगिरी बाळगली. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनाकडे संतुलित, तर्कसंगत आणि दयाळू दृष्टिकोन विकसित करण्यास प्रोत्साहित केले.

सत्राचा शेवट एका आकर्षक प्रश्नोत्तरांच्या सत्राने झाला, जिथे विद्यार्थ्यांनी जाती-आधारित राजकारण, सामाजिक न्याय आणि भारतीय लोकशाहीच्या बारकाव्यांबद्दल विचारपूस केली. प्राध्यापक आवटे यांनी या प्रश्नांची स्पष्टता आणि संयमाने उत्तरे दिली.

प्राचार्य, आयोजन  आणि विभागप्रमुख श्रीमती सिमरन नागवानी यांचे आभार मानून रूपसा सरकार यांनी आभार मानले. एकूणच, हे सत्र एक अत्यंत समृद्ध करणारा अनुभव होता, ज्यामुळे उपस्थितांना भारतीय संविधानाच्या तत्त्वांची आणि आजच्या समाजात त्यांची प्रासंगिकता सखोल समज मिळाली.

**अण्णासाहेब मगर महाविद्यालय, पुणे.२८**

उपक्रमांचे स्वरूपः




महोत्सवाच्या अंतर्गत विविध शैक्षणिक सांस्कृतिक आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले.

प्रतिज्ञा वाचन (१ फेब्रुवारी २०२५)

विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी एकत्र येऊन संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले.

निबंध स्पर्धा (५ फेब्रुवारी २०२५)

विषयः "भारतीय संविधान एक आदर्श लोकशाहीचा आधार"




विद्यार्थ्यांनी संविधानाच्या महत्त्वावर लेखन केले. भाषण व वादविवाद स्पर्धा (१० फेब्रुवारी २०२५

संविधानातील विविध कलमे अधिकार आणि कर्तव्यांवर विद्यार्थ्यांनी विचार मांडले.

४ चित्रकला व पोस्टर स्पर्धा (१५ फेब्रुवारी २०२५ संविधानाच्या मूल्यांवर आधारित कलाकृती सादर केल्या.

५ संविधान जागरूकता रॅली (२० फेब्रुवारी २०२५)

विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी संविधान जागरूकता फेरी काढून माहिती पत्रके वाटली.

२८ नोव्हेंबर २०२४ रोजी पुण्यातील **श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या लॉ कॉलेजमध्ये**




भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता. भारतीय संविधानाच्या ७५ वर्षांच्या स्मरणार्थ आणि संवैधानिक मूल्ये आणि अधिकारांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची माहिती:

कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या सत्काराने झाली. श्री शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज पुणेच्या प्राचार्या श्रीमती डॉ. क्रांती देशमुख यांनी प्रास्ताविक भाषण केले. त्यांनी या प्रसंगाचे महत्त्व आणि संवैधानिक जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित केले. श्री शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज पुणेच्या प्राचार्या डॉ. क्रांती देशमुख यांनी भारतीय संविधानाचा परिचय आणि त्याचे पैलू या विषयावर एक अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. त्यांनी मूलभूत अधिकारांशी संबंधित सर्व पैलू स्पष्ट केले आहेत.




निर्देशक तत्त्वे, संसदीय व्यवस्था निवडणूक प्रणाली तसेच भारतीय संविधानाची रचना कशी आहे. कार्यक्रमाचा समारोप श्रीमती तस्नीम शेख यांनी आभार मानून केला. त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पाहुण्यांचे, प्राध्यापकांचे, विद्यार्थ्यांचे आणि स्वयंसेवकांचे योगदान आणि सहभागाबद्दल आभार मानले.

भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवी उत्सव एक यशस्वी झाला, ज्यामुळे सहभागींमध्ये संवैधानिक मूल्यांची सखोल समज आणि प्रशंसा निर्माण झाली. या कार्यक्रमाने अंतर्दृष्टीपूर्ण चर्चांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि संवैधानिक हक्क आणि सामाजिक न्यायाचे समर्थन आणि प्रोत्साहन देण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

भारतीय संविधानाच्या ७५ वर्षांच्या पूर्ततेनिमित्त, **ए.बी.एमएस. परिषदेच्या यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेजने** २१ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये "भारतीय संविधानाची ७५ वर्षे आणि भारतीय लोकशाही" या शीर्षकाचा एक दिवसीय चर्चासत्र आयोजित केले .



या चर्चासत्रात दोन साधन व्यक्तींना आमंत्रित केले होते.  महाराष्ट्र नॅशनल लौ युनिव्हर्सिटी, मुंबई येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रतापसिंह साळुंके आणि पुणे येथील वाय.सी. लॉ कॉलेजचे सहाय्यक प्राध्यापक श्री. संजय सिरसाट. प्राचार्य डॉ. शुभदा घोलप यांनी दोन्ही सत्रांचे अध्यक्षस्थान भूषवले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. घोलप यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली, आणि चर्चेला सुरुवात झाली.




पहिल्या सत्रात, डॉ. साळुंके यांनी "भारतीय संविधान" या विषयावर भाषण दिले, ज्यामध्ये आपल्या समाजसुधारकांनी मांडलेल्या आकांक्षा आणि उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित केले गेले. त्यांनी संवैधानिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले आणि "संवैधानिक नैतिकता" आणि "न्यायिक जबाबदारी" या संकल्पनांवर चर्चा केली. डॉ. साळुंके यांनी भारतीय लोकशाहीसमोरील आव्हानांवर प्रकाश टाकला आणि संवैधानिक तत्त्वांच्या यशस्वी अंमलबजावणीत नेतृत्वाचे राजकीय स्वरूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावते यावर भर दिला.

दुसऱ्या सत्राचे नेतृत्व श्री. सिरसाट यांनी केले, त्यांनी "मूलभूत संरचना सिद्धांत: भारतीय संवैधानिक न्यायशास्त्रातील एक मैलाचा दगड" या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी भारतीय सर्वोच्च न्यायालयाने या सिद्धांताची स्थापना करण्यास कारणीभूत असलेल्या पार्श्वभूमी आणि महत्त्वाच्या निर्णयांचा शोध घेतला. श्री. सिरसाट यांनी मूलभूत संरचना सिद्धांताने मर्यादित सरकारची संवैधानिक उद्दिष्टे कशी सुनिश्चित केली आहेत आणि संविधानाच्या मूलभूत संरचनेचे रक्षण कसे केले आहे यावर सविस्तरपणे सांगितले.

दोन्ही सत्रांनंतर परस्परसंवादी चर्चा झाली, जिथे सहभागींना प्रश्न विचारण्याची संधी मिळाली, ज्यांचे निराकरण संसाधन व्यक्तींनी केले. चर्चासत्राचा समारोप बी.ए.एल.एल.बी. च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी सुकृती मेहता यांनी आभार मानले. चर्चासत्राचे सूत्रसंचालन प्रा. (डॉ.) रवींद्र पाटील आणि सहाय्यक प्रा. श्रद्धा माने यांनी केले आणि एकूण १२२ विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला हजेरी लावली.

**सेंट मीराज कॉलेज फॉर गर्ल्स** राज्यशास्त्र विभागाने २५ ते २७ नोव्हेंबर २०२४ या



कालावधीत संविधान दिनानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले, ज्याचा उद्देश भारतीय संविधान आणि त्याच्या तत्त्वांबद्दल विद्यार्थ्यांची समज वाढवणे हा होता. नागरी जबाबदारी आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना वाढवणे, विद्यार्थ्यांना संविधानात समाविष्ट असलेल्या मूल्यांशी संलग्न होण्यास प्रोत्साहित करणे, या कार्यक्रमांची रचना करण्यात आली होती. या उपक्रमांमुळे




विद्यार्थ्यांना न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाचे महत्त्व अधोरेखित करून लोकशाही समाजात सक्रिय नागरिक म्हणून त्यांच्या भूमिकांवर चिंतन करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले.

या कार्यक्रमांच्या मालिकेत विविध आकर्षक उपक्रमांचा समावेश होता, ज्यांची सुरुवात २५ नोव्हेंबर रोजी प्रस्तावनेच्या सामूहिक वाचनापासून झाली, जिथे विद्यार्थ्यांनी संवैधानिक मूल्यांप्रती असलेल्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. २६ नोव्हेंबर रोजी, "भारतीय



संविधान: आपले हक्क आणि कर्तव्ये" या थीमवर पोस्टर बनवण्याच्या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना संवैधानिक तत्त्वांबद्दलची त्यांची समज सर्जनशीलपणे व्यक्त करण्याची संधी मिळाली. शेवटच्या दिवशी, २७ नोव्हेंबर रोजी, एक विशेष सत्र आणि एक नाटकाचे सादरीकरण केले. ज्यामध्ये वैयक्तिक हक्क आणि सामूहिक जबाबदाऱ्यांचे संतुलन राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले गेले. सत्रात विद्यार्थ्यांच्या जीवनावर संविधानाच्या प्रभावावर सखोल चिंतन करण्यासाठी परस्परसंवादी चर्चा देखील समाविष्ट होती. या कार्यक्रमांनी विद्यार्थ्यांचा संवैधानिक मूल्यांशी संबंध प्रभावीपणे वाढवला, सक्रिय नागरिकत्व आणि जबाबदारीला प्रोत्साहन दिले.

भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त 'संविधान गौरव महोत्सव" अंतर्गत **डॉ. डी. वाय.**




**पाटील युनिटेक सोसायटीचे डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पिंपरी पुणे १८** महाविद्यालयात विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

१. अतिथी व्याख्यान : कला शाखेच्या वतीने दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय पिंपरी, पुणे येथील प्रा. सागर वर्मा यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'भारतीय संविधान एक ग्रंथ आणि त्या पलिकडे' या विषयावर बोलताना प्रा. सागर वर्मा यांनी संविधान म्हणजे काय? व संविधानचे महत्त्व याविषयी विवेचन केले.




२. भित्तीपत्रक स्पर्धाः रसायनशास्त्र व मराठी विभागांच्या वतीने दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी 'भारतीय संविधान' या विषयावर भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विज्ञान शाखा व इतर शाखेतील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

३. निबंध स्पर्धाः संगणकशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये संगणकशास्त्र व इतर विभागातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

४. पोस्टकार्ड मेकिंग स्पर्धाः बीबीए विभागाच्या वतीने दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी संविधान विषयक व्हिडीओ दाखवून पोस्टकार्ड मेकींग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी संविधान जनजागृतीविषयक पोस्टकार्ड तयार करून प्रदर्शित केले.

५. निबंध स्पर्धाः बायोटेक विभागाच्या वतीने दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये बायोटेक विभाग व इतर विभागातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

६. प्रश्नमंजुषा स्पर्धाः वाणिज्य विभागाच्या वतीने दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये वाणिज्य व इतर शाखेतील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.




**गेनबा सोपानराव मोझे महाविद्यालय, येरवडा, पुणे** 'संविधान गौरव महोत्सव' यांच्या वतीने पुढील कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. राज्यशास्त्र विभागाच्या सहा. प्रा. भाग्यश्री कचरे आणि इतर विभागातील प्राध्यापकांनी सदर कार्यक्रम आणि स्पर्धा एकत्रितपणे पार पाडल्या. या

स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. डॉ. रंजना भदाणे यांचे मार्गदर्शन सदर महोत्सवामध्ये पुढील कार्यक्रम आणि स्पर्धा घेण्यात आल्या.

**वक्तृत्व स्पर्धा**

वक्तृत्व स्पर्धा दिनांक 6 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 10.00 ते 12:30pm वाजता आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेत महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान (बी.सी.एस.) या शाखेतील एकूण 15 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या वक्तृत्व स्पर्धेचा विषय 'भारतीय राज्यघटनेची ओळख' हा होता. ही स्पर्धा त्यांच्यामध्ये व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि त्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळावा यासाठी आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला, या स्पर्धेत्ता उद्देश केवळ विद्यार्थ्यां वक्तृत्व कौशल्य पाहणे इतकेच नव्हते तर विद्यार्थ्यांचे बौद्धिक आकलन, मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये, सामाजिक प्रश्नांची जाणीव, सामाजिक बांधिलकी व आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची कल्पकता पाहणे हे देखील होते ज्यामुळे विद्यार्थ्यांचे एकूण व्यक्तिमत्व सुधारेल.

**प्रश्नमंजुषा स्पर्धा**

प्रश्नमंजुषा स्पर्धा दिनांक 28 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 9.30am ने 11:00am वाजता आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण 32 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता व त्यांचे 8 गट केले होते. प्रत्येक गटात 4 विद्यार्थी होते. प्रश्नमंजुषा स्पर्धेत तीन फेऱ्या होत्या. पहिल्या फेरीत प्रत्येकी एक प्रश्न विचारला गेला त्यासाठी प्रत्येकाला दहा गुण होते. दुसरी आणि तिसरी फेरी ही सर्वांसाठी होती ज्याच्यामध्ये भोंगा वाजवणाऱ्याला प्रथम संधी देण्यात आली. प्रश्न हे भारतीय राज्यघटनेची ओळख या ज्ञानावर आधारित होते.

**निबंध स्पर्धा**



निबंध स्पर्धा दिनांक 25 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 11.00 ते 12:30pm वाजता आयोजिन करण्यात आली होती या स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण 41 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.या निबंध स्पर्धेचा विषय 'भारतीय राज्यघटनेची ओळख' हा होता. अशा या स्वरूयात्ते समकालीन वास्तवावर तसेच भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करायला लावणारा विषय विद्यार्थ्यांना देण्यात आला होता.




**पोस्टर स्पर्धा**

पोस्टर स्पर्धा दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:०० ते १२:३० या वेळेत आयोजित करण्यात आली होती. या पोस्टर स्पर्धेचा विषय 'भारतीय राज्यघटनेची ओळख' हा होता. या स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण २७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता

**व्याख्यान आयोजन**

प्रा.मा. निलेश देशपांडे यांचे भारतीय राज्यघटना या विषयावर व्याख्यान दिनांक 21 फेब्रुवारी 2025 रोजी १०:०० ते १२:३० या वेळेत आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. रंजना भदाणे यांनी भूषविले. सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक कु. भाग्यश्री कचरे यांनी केले आणि पाहुण्यांची ओळख डॉ. कादीर शेख यांनी केली. आभार श्री. कृष्णा शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

भारतीय संविधानाची जाणीव करून देणे आणि संविधान निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला अभिवादन करणे हा होता. सदर कार्यक्रमा अंतर्गत, संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ आयोजित संविधान दिन कार्यक्रमात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संविधान जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. त्यामध्ये महाविद्यालयातील एकूण १० विध्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. तसेच महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या देशभक्त केशवराव जेधे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत भारतीय संविधानाची 75 वर्ष हा विषय देखील देण्यात आला आणि भारतीय संविधानाचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने स्वारगेट आगारामध्ये संविधानाच्या उदेशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दिपाली पाटील यांनी मार्गदर्शन केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत करण्यात आले.


जेधे महाविद्यालय येथे उद्देशिकेचे सामूहिक वाचन





## जेधे महाविद्यालयात प्रतिमा पूजन

श्री शिवाजी मराठा सोसायटीचे समाज भूषण बाबूराव उर्फ आप्पासाहेब जेधे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्राचार्या डॉ. दिपाली पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. उपक्रमाचे आयोजन जिल्हा समन्वयक डॉ. शिवाजी पावरणे व डॉ. अमित गोगवले, डॉ. अर्चना गायकवाड यांनी केले.

पुणे : आप्पासाहेब जेधे महाविद्यालयातील संविधान दिन साजरा करण्यात आला.







भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती अनुषंगाने पांडुरंग शामराव मुळगांवकर विशेष शिक्षण अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक यांनी खालील उपक्रमांचे आयोजन केले होते.

"भारतीय राज्यघटनेची ओळख" याविषयी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य प्रा. संदिप चवरे यांनी मार्गदर्शन केले.
राज्य घटनेच्या विविध बाबी संदर्भात चर्चासत्र आयोजित केले, यामध्ये महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक चांगदेव कळसाईत व महाविद्यालयातील विद्यार्थिनी कविता गोलवड यांनी सहभाग घेतला.

**श्री शाहू मंदिर महाविद्यालयात** निबंध, वक्तृत्व, रांगोळी स्पर्धाने आयोजन करण्यात आले होते दिनांक 17 ते 22 फेब्रुवारी 2025 या कालावधीत उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक व

विविध प्रकारच्या शैक्षणिक सवलती मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या जात प्रवर्गाचे दाखले, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखला इत्यादी महाविद्यालयातील विद्यार्थी व पालक यांच्यासाठी रोशनी फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. तसेच कॅनरा बँक, स्वारगेट यांच्यावतीने विद्यार्थ्यांचे शिष्यवृतीसाठीचे विद्यार्थी बचत खाते उघडण्यात आले. दिनांक 22 फेब्रुवारी 2025 गेजी प्रोफिसिएंट टीचिंग आणि समान संधी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकरिता महात्मा फुले आर्थिक विकास मंडळ, कौशल्य विकास योजना एक महिन्याकरिता राबविण्यात येत आहे. कौशल्य विकासाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण आणि रोजगार निर्मिती करता येणार आहे. या महोत्सवात एकूण 52 विद्यार्थ्यांनी लाभ घेतला

निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, रैली, व्याख्यान संविधान विषयावर डॉक्युमेंटरी दाखविण्यात आले. इत्यादी अनेक कार्यक्रम महाविद्यालयात राबवण्यात आले.

**महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन** या महाविद्यालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.




उपक्रमांचे स्वरूपः

महोत्सवाच्या अंतर्गत विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि चर्चासांचे आयोजन करण्यात आले.

1. प्रतिज्ञा वाचन

* विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी एकत्र येऊन संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले.

2. निबंध स्पर्धा

विषयः "भारतीय संविधान एक आदर्श लोकशाहीचा आधार"

* विद्यार्थ्यांनी संविधानाच्या महत्त्वावर लेखन केले.

3. भाषण व वादविवाद स्पर्धा
संविधानातील विविध कलमे, अधिकार आणि कर्तव्यांवर विद्यार्थ्यांनी विचार मांडले.




4. चित्रकला व पोस्टर स्पर्धा
संविधानाच्या मूल्यांवर आधारित कलाकृती सादर केल्या.
5. संविधान जागरुकता रॅली
संविधान जागरुकता फेरी काढून माहिती पत्रके वाटली.
6. विशेष व्याख्यानमाला
प्राध्यापक व तज्ज्ञ मंडळींनी संविधानावरील चर्चासत्र घेतली.

**कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे डॉ. अरविंद ब. तेलंग महाविद्यालय, निगडी, पुणे** यांनी विद्यार्थ्यां राष्ट्रीय भावना जागृत करणे या उद्देशाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले.
१. मार्गदर्शन सत्रः दिनांक. गुरुवार, ६ फेब्रुवारी २०२५
वक्तेः सिनियर कमांडर प्रमोद राय
विषयः विद्यार्थ्यांची राष्ट्राप्रती कर्तव्ये व जबाबदाऱ्या
या सत्रात सिनियर कमांडर प्रमोद राय यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्यांविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी संविधानात नमूद असलेल्या जबाबदाऱ्या कशा प्रकारे प्रत्येक नागरिकाने पार पाडाव्यात याचे प्रभावी विवेचन केले.

२. निबंध स्पर्धाः दिनांकः गुरुवार, १३ फेब्रुवारी २०२५
विषयः भारतीय राज्यघटनेची ओळख
यामध्ये भित्तिपत्रक स्पर्धा, निबंध स्पर्धा, पोस्ट कार्ड मेकिंग स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सांगवी, पुणे येथील **बाबुरावजी घोलप महाविद्यालयाच्या** राज्यशास्त्र विभागाने जिल्हा शिक्षण प्राधिकरणाच्या सहकार्याने सोमवार, २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये संविधान दिनानिमित्त एक कार्यक्रम आयोजित केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या आणि प्राचार्य डॉ. संगीता जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे डॉ. महेश शिरापूरकर (द युनिक अकादमी पुणे) यांच्यासह प्रा. अरियम डोके, डॉ. भरत राठोड, डॉ. जितेंद्र वडशिंगकर, डॉ. विद्या पठारे, डॉ. विजय हैघरे आणि प्रा. तुषार भुसे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.





कार्यक्रमाची सुरुवात डॉ. संगीता जगताप आणि डॉ. महेश शिरापूरकर यांनी संविधानाच्या प्रतिमेचे पूजन करून केली, त्यानंतर २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली. प्रथम वर्षाचा विद्यार्थी प्रणय माने याने संविधानाचे वाचन केले आणि उपस्थितांना शपथ दिली. डॉ. भरत राठोड यांनी भारतीय संविधानाच्या उत्पत्तीचा आढावा घेतला, त्याचा पाया भारत सरकार कायदा १९३५ आणि संविधान सभेच्या प्रयत्नांवर आधारित होता. प्राचार्य डॉ. जगताप यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले, विशेषत: महिलांसाठी न्याय, समानता आणि अधिकार सुरक्षित करण्यात त्याच्या जागतिक वैशिष्ट्यावर भर दिला. प्रमुख पाहुण्या डॉ. शिरापूरकर यांनी भारतीय संविधानाचे जिवंत स्वरूप आणि भारतीय समाजातील त्याची परिवर्तनकारी भूमिका यावर चर्चा केली.

कार्यक्रमाचा समारोप प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याने गिरीश वाघमारे यांच्या भाषणाने झाला, त्यांनी संविधानात नमूद केलेल्या कर्तव्यांचे पालन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले, त्यानंतर प्रा. प्राजक्ता कुंभार यांनी आभार मानले आणि राष्ट्रगीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गोरक्ष डेरे यांनी केले.

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड पुणे**:



भारतीय संविधान प्रत्येक भारतीय नागरिकाच्या जीवनाचा एक महत्वाचा भाग बनलेला आहे. संविधानावरच लोकशाही उभी असते म्हणजेच संविधान हा लोकशाहीचा आत्माच आहे. आपले भारतीय संविधान जगातील सर्वात मोठे संविधान मानले जाते. आपल्या संविधानाच्या मुल्यांची, तत्वांची जाणीव उद्याच्या भारताच्या भविष्याला म्हणजेच विद्यार्थ्यांना व्हावी म्हणूनच भारतीय संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी फेब्रुवारी २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर विध्यार्थ्यांसाठी



विविध कार्यक्रम घेण्यात आले आणि या फेब्रुवारी महिन्यात संविधान गौरव महोत्सव साजरा

करण्यात आला. भारतीय संविधानाचे महत्त्व आणि भारतीय संविधान लोकशाहीचा आधार या दोन विषयांवर महाविद्यालयात निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. डॉ नीता बोकील यांनी आपले संविधान यावर व्याख्यान दिले.



२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारलेले आणि २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आलेले भारतीय संविधान हे देशाच्या प्रशासनाची चौकट मांडणारे सर्वोच्च कायदेशीर दस्तऐवज आहे. ते नागरिकांचे मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे आणि कर्तव्यांसह सरकारी संस्थांचे राजकीय संहिता, रचना, कार्यपद्धती, अधिकार आणि कर्तव्ये यांचे आरेखन करते. संविधान स्वीकारताना, संविधानात ३९५ कलमे आणि ८ अनुसूची होती, ज्यामुळे ते आतापर्यंतचे सर्वात मोठे राष्ट्रीय संविधान बनले. संविधान स्वीकारल्याचा ७५ वा वर्धापन दिन लोकशाही, न्याय आणि समानतेप्रती भारताच्या अटल वचनबद्धतेची आठवण करून देतो, जो देशाच्या लोकशाही प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा आहे.




या महत्त्वपूर्ण प्रसंगाचे साजरे करण्यासाठी, **एम.सी.ई. सोसायटीच्या पुणे येथील एच.जी.एम. आझम कॉलेज ऑफ एज्युकेशनने** संविधान स्वीकारल्याच्या ७५ व्या वर्षाचे स्मरण करण्यासाठी २०२५ मध्ये संविधान गौरव महोत्सवाचे आयोजन केले. महाविद्यालयाने निबंध लेखन स्पर्धा, पोस्टर मेकिंग स्पर्धा, ऑनलाइन क्विझ आणि अतिथी व्याख्यान यासह विविध उपक्रमांचे आयोजन केले. बी.ए.बी.एड., बी.एससी. बी.एड., एम.एड. आणि बी.एड. कार्यक्रमांमधील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. निबंध लेखन स्पर्धा "भारतीय संविधान" या विषयावर केंद्रित होती, तर पोस्टर मेकिंग स्पर्धा "भारतीय संविधानाची प्रमुख वैशिष्ट्ये" यावर केंद्रित होती. २८ फेब्रुवारी रोजी

आयोजित अतिथी व्याख्यानाचे आयोजन  सहाय्यक प्रा. मंगेश चव्हाण यांनी केले आणि भारतीय संविधानाच्या विविध पैलूंबद्दल अंतर्दृष्टी प्रदान केली. याव्यतिरिक्त, सहाय्यक प्रा. मधु कुचेकर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी प्रस्तावनेचे वाचन आयोजित करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. अनिता बेलापूरकर यांनी सहभागींच्या उत्साहाचे आयोजन आणि कौतुक करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आणि स्पर्धांमधील विजेत्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

**डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या श्री. नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज, पुणे,** सेमिनार विभाग आणि कायदेशीर संशोधन कक्षाने महाराष्ट्र सरकारच्या कायदा आणि न्याय विभागाच्या, कायदे शाखा आणि नेपाळ लॉ कॅम्पस, त्रिभुवन विद्यापीठ, नेपाळ यांच्या सहकार्याने "भारतीय संविधानाची ७५ वर्षे भूतकाळातील आणि भविष्याचा मार्ग" या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय सेमिनार आयोजित केला.




➤ श्रीमती सुप्रिया धावरे, ड्राफ्ट्समन-सह-संयुक्त सचिव कायदा आणि न्याय विभाग, महाराष्ट्र सरकार.

➤ माननीय न्यायाधीश प्रसन्न बी. वराळे, न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली

महाराष्ट्र सरकारच्या ड्राफ्ट्समन-सह-संयुक्त सचिव कायदा आणि न्याय विभागाच्या संत सुप्रिया धावरे यांच्या हस्ते उद्घाटन समारंभाने चर्चासत्राची सुरुवात झाली. इतर मान्यवर उपाध्यक्ष आदि अशोक पलांडे होते. दिल्ली विद्यापीठाच्या कायदा शाखेच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सीमा सिंग, दिल्ली विद्यापीठाच्या कायदा शाखेच्या प्राध्यापिका डॉ. अंजा डॉ. सुनिता आढाव यांनी त्यांच्या उद्घाटन भाषणात सर्व टिकूंचे स्वागत करत उपस्थितांना संबोधित केले. दिल्ली विद्यापीठाच्या कायदा शाखेच्या प्राध्यापिका आणि डीईएस एसएनएफएलसीच्या प्राचार्य डॉ. सुनीता आढाव, डॉ. उदय शंकर, सहाय्यक मान्यवरांनी संविधानाच्या प्रवास, विकास, आव्हाने आणि भविष्यातील शक्यतांवर चिंतन करण्यासाठी सहभागींना प्रोत्साहित करण्याचे



उद्दिष्ट मांडले. डॉ. आढाव यांनी शिक्षण भागीदारांचे मौल्यवान वेळ आणि पाठिंब्याबद्दल आभार मानले. त्यांनी सलग तिसऱ्या वर्षी ज्ञानाची देवाणघेवाण, बौद्धिक वाढ आणि सहभागींमध्ये अर्थपूर्ण चर्चा करण्यासाठी व्यासपीठ म्हणून काम केले आहे हे सांगितले. प्रमुख पाहुण्या श्रीमती सुप्रिया धावरे यांनी भारतीय संविधानाच्या ७५ वर्षांवर अभ्यासपूर्ण भाषण दिले, ज्यामध्ये त्याच्या ऐतिहासिक उत्क्रांती, मूलभूत तत्त्वे आणि समकालीन आव्हानांवर चिंतन केले. त्यांनी भारताच्या संविधानाच्या मसुद्यात संविधान सभेची भूमिका अधोरेखित केली, त्याच्या ३८९ सदस्यांपैकी १५ महिलांच्या योगदानावर भर दिला. त्यांनी नमूद केले की भारत सरकार कायदा, १९३५ हा पाया म्हणून काम करत असताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील विधानसभेने स्वतंत्र भारताला अनुकूल करण्यासाठी त्यात सुधारणा केली. त्यांनी कलम ३२ चे महत्त्व अधोरेखित केले, त्याला संविधानाचे "हृदय आणि आत्मा" म्हटले, तसेच कलम ३६८, सुधारणांद्वारे अनुकूलता सुनिश्चित करते, विकसित गरजा पूर्ण करण्यासाठी १०६ वेळा सुधारित केले गेले आहे.




**व्यवस्थापन आणि संशोधन संस्था पुणे -०९**, एआयसीटीई द्वारे मंजूर, डीटीई (महाराष्ट्र सरकार) द्वारे मान्यताप्राप्त, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न संस्थाने विविध उपक्रम घेतले.

**रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयाच्या** तर्फे संविधान 75 वर्ष पूर्ण होत असल्या निमित्त विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. संविधान गौरव रॅली, संविधान उद्देशिकेचे वाचन तसेच संविधान गौरव व्याख्यान या विविध उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयातर्फे करण्यात आले या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला.





**रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध,पुणे** यांच्यावतीने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत एकूण 20 स्पर्धकांनी भाग घेतला.



विषय - 'भारतीय राज्यघटनेची ओळख' असा होता. स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.







पूना कॉलेज, पुणे यांच्या वतीने भारतीय राज्यघटनेची प्रभावितता आणि समावेशकता या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

**प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे-५** च्या ग्रंथालय आणि माहिती केंद्राने प्राचार्य डॉ. आर. एस. झुंजारराव यांच्या मार्गदर्शनाखाली "संविधान दिन (राष्ट्रीय कायदा दिवस)" साजरा केला, ज्याला संविधान दिवस म्हणूनही ओळखले जाते. या वर्षी भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा केला जातो. भारताच्या संविधानाच्या स्वीकृतीच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी भारतात संविधान दिवस साजरा केला जातो. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी, भारताच्या संविधान सभेने भारताचे संविधान स्वीकारले आणि ते २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आले. भारत सरकारने १९ नोव्हेंबर २०१५ रोजी एका राजपत्र अधिसूचनेद्वारे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन



म्हणून घोषित केला. भारताचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी यांनी ११ ऑक्टोबर २०१५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'पुतळ्याची पायाभरणी करताना ही घोषणा केली.



मुंबईतील समता स्मारक. संविधानाचे महत्त्व पसरविण्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कल्पना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी २६ नोव्हेंबर हा दिवस निवडण्यात आला.

भारतरत्न स्वर सम्राज्ञी लता मंगेशकर सभागृहात आयोजित कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉबाबासाहेब आंबेडकर आणि संविधान प्रस्तावनेला नमस्कार करून झाली. "भारतीय




संविधान दिना" बद्दल थोडक्यात प्रस्तावना महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. एस. एस. सेनगुप्ता यांनी सादर केली. प्राचार्यांनी भारतीय संविधानाची प्रस्तावना वाचली, त्यानंतर सभागृहात उपस्थित प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी भाषण दिले. असेंब्ली हॉलमध्ये भारतीय संविधानावरील पुस्तके देखील प्रदर्शित करण्यात आली.

त्यानंतर राज्यसभा टीव्हीच्या १० व्या मालिकेतील भूसुधार कायदा संविधान निर्मितीचे व्हिडिओ सादरीकरण करण्यात आले. इलेक्ट्रॉनिक विज्ञान विभागाचे प्रा. ए. व्ही. कांबळे यांनी मालिकेचा सहावा भाग दाखवला. ज्यामुळे आपण सर्वजण भारतीय संविधानाच्या ऐतिहासिक निर्मितीचे साक्षीदार बनलो. ज्युनियर कॉलेजचे पर्यवेक्षक प्रा. सुभाष कारेकर यांनीही आपले विचार व्यक्त केले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब  आंबेडकर यांचे जीवन आणि कार्य थोडक्यात सादर केले. प्राचार्य सरांनी राष्ट्रासाठी आणि आपल्या जीवनात संविधानाचे महत्त्व याबद्दल उपस्थितांना  संबोधित केले. त्यांनी  भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वाचे योगदान आणि विचारसरणी आणि त्यांच्या जीवनातून आपण सर्वजण काय शिकू शकतो यावरही प्रकाश टाकला. डॉ. शांतश्री सेनगुप्ता यांनी सूत्रसंचालन केले आणि श्री. अमित साळुंके, लिपिक-ग्रंथालय यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाबद्दल आभार मानले.

## महाविद्यालयीन अहवाल : पुणे जिल्हा ग्रामीण

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघीरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सासवड यांची पुणे जिल्हा ग्रामीण विभागाचे समन्वयक म्हणून नियुक्ती केली गेली. पुणे ग्रामीण विभागात पुढील महाविद्यालयांचा समावेश होता.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|
| १. | वाघीरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे |
| २. | बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता. आंबेगाव, जि.पुणे |
| ३. | डॉ. डी. वाय. पाटील महिला महाविद्यालय, पिंपरी |
| ४. | एकनाथ सीताराम दिवेकर महाविद्यालय, वरवंड , ता.दौंड, जि.पुणे |
| ५. | हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर, ता. खेड, जि.पुणे |
| ६. | सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय, केडगाव, ता. दौंड, जि.पूर्ण |
| ७. | कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भिगवण, ता. इंदापूर, जि. पुणे |
| ८. | सी. टी. बोरा महाविद्यालय, शिरूर ता. शिरूर, जि. पुणे |
| ९. | के. जी. कटारिया कॉलेज, दौंड जि. पुणे |
| १०. | शरदचंद्रजी पवार महाविद्यालय, जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे |
| ११. | वसंतराव पवार विधी महाविद्यालय, बारामती, जि. पुणे |
| १२. | शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, बारामती, जि. पुणे |
| १३. | विद्‌या प्रतिष्ठानचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बारामती, जि. पुणे |
| १४. | अण्णासाहेच आवटे महाविद्यालय, चरता आवेगाड, जि.पुणे |
| १५. | विश्वासराव रणसिंग महाविद्‌यालय, कळव वालचदनगर, ता. इंदापूर जि. पुणे |
| १६. | अमृतेश्वर महाविद्यालय, विंझर, ता. वेल्हे, जि. पुणे |
| १७. | मु.सा. काकडे महाविद्यालय सोमेश्वरनगर-वाघळवाडी, ता. बारामती, जि.पुणे |
| १८. | कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर जि.पुणे |
| १९. | समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे |
| २०. | श्री शिवछत्रपती महाविदयालय जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे |
| २१. | तुळजाराम चतुरचंद महाविद्‌याल, बारामती जि. पुणे |

| | |
|---|---|
| २२. | अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालय, ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे |
| २२ . | शंकरराव भेलके महाविदयालय, नसरापूर ता. भोर, जि. पुणे |
| 2४. | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे |
| २५. | अनंतराव पवार महाविदयालय, पिरंगुट ता. मुळशी, जि. पुणे |

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघीरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सासवड महाविद्यालयात**

भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त 'संविधान गौरव महोत्सव" या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.भित्तीपत्रक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी राज्यघटनेच्या अनुषंगाने विषयांची मांडणी केली, प्रा.डॉ. राजकुमार रिकामे यांचे भारतीय संविधान या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. भारतीय राज्यघटनेवर आधारित प्रश्नांवर प्रश्नमंजुषा घेण्यात आली.





**आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव,ता. आंबेगाव, जि. पुणे** यांच्या राज्यशास्त्र विभागाने विविध कार्यक्रम राबवले




या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर उपप्रचार्य डॉ. बाळासाहेब गव्हाळे, राज्यशास्त्र विभाग समन्वयक प्रा. सुनील नेवकर, प्रा. हनुमंत देवरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. माणिक बोऱ्हाडे, प्रा. तुषार गभाले, कार्यालयीन अधीक्षक श्री. गणेश काळे, सेवक मारुती दरेकर, व्होकेशनल ट्रेनींग सेंटर या विभागातील विद्यार्थिनी. तसेच महाविद्यालयातील 50 विद्यार्थी व विद्यार्थिनी या सर्वांना राज्यशास्त्र विभाग समन्वयक प्रा.

सुनील नेवकर यांनी राज्यघटनेत नमूद केलेली मूल्य जपण्यासाठी शपथ दिली व भारतीय राज्यघटनेतील उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.



**मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय, सोमेश्वर नगर, तालुका बारामती जिल्हा पुणे** महाविद्यालयाच्या वतीने संविधान निर्मितीची प्रक्रिया त्याची अंमलबजावणी वाटच्या काळामध्ये त्याची उपयुक्त या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले गेले.

संविधान उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन

निबंध स्पर्धा

वक्तृत्व स्पर्धा

पोस्टर निर्मिती स्पर्धा

प्रश्नमंजुषा स्पर्धा (Online Quiz)





व्याख्यान - विषय. : 'भारतीय राज्यघटना व वैज्ञानिक दृष्टिकोन'



**भीमथडी शिक्षण संस्थेचे स्व किसनदास गुलाबचंद कटारिया महाविद्यालय दौंड** यांच्यावतीने संविधान गौरव महोत्सव अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात**



भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त संविधान गौरव महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

१. भारतीय लोकशाही या मुख्य शीर्षकाखाली महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभागाच्या वतीने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले. या निमित्ताने 'भारतीय राज्यघटनेची ओळख, वाटचाल व आव्हाने' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये एकूण ८९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

२. 'भारतीय राज्यघटनेची ७५ वर्ष व मानवी हक्क' या विषयावर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विशेष व्याख्यान आयोजित केले.दि. १५ फेब्रुवारी २०२५ आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ६६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

३. दि. २१ फेब्रुवारी २०२५ भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे सामुहिक प्रतिज्ञा वाचन करण्यात आले यात एकूण ८९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

४. दि. २७ फेब्रुवारी २०२५ महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेची ओळख या विषयावर निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण १३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**अमृतेश्वर कला, वाणिज्य आणि विज्ञान मष्ठाविद्यालय, विंझर** राष्ट्रीय सेवा योजना



(NSS) विभाग आणि राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाच्या ऐतिहासिक ७५ व्या वर्धापन दिनानिमित "संविधान गौरव उत्सव" साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश भारतीय संविधानाविषयी सखोल समज विकसित करणे, त्याची आधुनिक समाजातील उपयुक्तता अधोरेखित करणे आणि नागरी जबाबदारी व कायदेशीर साक्षरता वाढवणे हा होता.कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या उद्दिष्टांची  ओळख करून देण्याच्या सत्राने झाली, ज्यामुळे उपस्थितांना भारताच्या संविधानिक प्रवासाबद्दल विस्तृत माहिती मिळाली. या उत्सवात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि मान्यवर वक्ते यांनी संविधानाच्या महत्त्वावर आपले विचार मांडले.इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. बालासाहेब केंदळे यांनी भारतीय संविधानाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर विस्तृत चर्चा केली. त्यांनी संविधानाचे मूलभूत तत्त्व, जसे की न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यावर प्रकाश टाकला. भारतीय संविधानवादाचा विकास आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांसारख्या महान नेत्यांचे योगदान त्यांनी स्पष्ट केले.

**तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती** यांच्या




वतीने "संविधान गौरव महोत्सव" या उपक्रमा अंतर्गत "भारतीय संविधानाची ७५ वर्ष" या विषयावर प्रा. ज्योत्सना गायकवाड, राज्यशास्त्र विभागप्रमुख, (विश्वासराव रणशिंग महाविद्यालय, कळंब, ता. इंदापूर, जि. पुणे.) यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच 'भारतीय संविधान' या विषयावर पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन

करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. ज्योत्सना गायकवाड उपस्थित होत्या.



**शरदचंद्रजी पवार महाविद्यालय, जेजुरी** येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. 3 मार्च 2025 या दिवशी महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेची ओळख याविषयी निबंध स्पर्धा मायोजित करण्यात आली होती. या निबंध स्पर्धेत महाविद्यात्तयातील प्रथम वर्ष बीए व बी कॉम तसेच द्वितीय वर्ष बी ए बी कॉम व तृतीय वर्ष बी ए बी कॉम असे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी राज्यघटनेची ओळख याविषयी निबंध लिहिले. यामध्ये राज्यघटना, तिचे महत्त्व राज्यघटनेतील मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्य, धर्मविषयता, पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा, राज्यसभा, न्यायव्यवस्था, राष्ट्रीय एकात्मता, बंधुता, संघराज्य, लोकशाही, याविषयी मुलांनी अतिशय चांगल्या प्रकारे निबंध लिहिले आहेत. या कार्यक्रमाला राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी नागणे, उपप्राचार्य बी.बी. कोलते, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजकुमार रिकामे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे संयोजन प्राध्यापक झोंबाडे यांनी केले.

भारतीय राज्यघटने विषयी विद्यार्थ्यांना जाणीव जागृती व्हावी, भारतीय लोकशाही म्हणजे काय,राज्यघटना म्हणजे काय ,मूलभूत हक्क म्हणजे काय, संसद म्हणजे काय, राष्ट्रपतीचे अधिकार कोणते, न्यायव्यवस्था कोणती आहे, मूलभूत कर्तव्य किती आहेत, लोकसभेचे अधिकार कोणते, पद व अधिकार कोणते, याविषयी प्रश्नमंजुषा हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये 30 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे संयोजन राज्यशास्त्र विभागांनी केले.

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्लम्पुर संचलित, समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय, लोणी काळभोर.ता. हवेली, जि. पुणे** मध्ये राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 26/11/2024 रोजी संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. संविधान दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मंजुळकर ए.के यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून संविधान प्रतीचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. घोडके व्ही. आर. यांनी केले. तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. गीतांजली चव्हाण यांनी संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व सांगितले. संविधानाला या वर्षी 75 वर्ष पूर्ण होत असल्याने संपूर्ण देशभर संविधान दिन मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे असे सांगितले. कोणत्याही देशाला कायद्याची नियमांची गरज असते जर कायदे नियम नसतील तर तो देश अराजकतेकडे वाटचाल करेल, हे संविधान निर्मात्यांनी तेव्हाच ओळखले होते म्हणून कोणत्याही देशाला संविधानाची आवश्यकता आहे. असे प्रा. गीतांजली चव्हाण यांनी सांगितले.



संविधान दिनाच्या निमित्ताने राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान पोस्टर प्रदर्शन ठेवण्यात आले होते. त्याचे उद्घाटन माननीय प्राचार्य डॉ. ए. के. मंजुळकर यांच्या शुभहस्ते झाले.




**इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर** येथे ' संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विविध उपक्रम राबविले गेले. दिनांक 20 नोव्हेंबर 2024 रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना व एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी संविधान दिनानिमित्ताने महाविद्यालय प्रवेशद्वार ते भारतरत्न डा.

बाबासाहेब आंबेडकर पुतळा रैली चे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. शिवाजी वीर, विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. तानाजी कसवे, प्रमुख ,प्राध्यापक जगताप, एन सी.सी प्रमुख प्रा. दिनेश जगताप, परीक्षा विभागप्रमुख प्रा. फलफले एन. एस एस चे प्रा. साठे प्रा. गायकवाड मॅडम, प्रा जाधव मॅडम कार्यलयीन प्रमुख श्री. भंडलकर आणि महाविद्यालयातील इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी असे सर्वजण या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी हमारा देश हमारा संविधान एक देश एक संविधान अशा घोषणा देत दिल्या. नगरपालिकेसमोरील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व क्रांती स्तंभास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली** येथे राज्यशास्त्र विभागाच्या वतीने 'भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव' याचा भाग म्हणून भारतीय संविधान व संविधानिक प्रक्रियेबद्दल माहिती प्रदर्शित करणाऱ्या माहितीपत्रकांचे प्रदर्शन महाविद्यालयात करण्यात आले. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख अतिथी मा. प्रकाशजी लोढा यांच्या हस्ते व मा. धीरजजी ओसवाल (सदस्य, प्रबंध समिती, बीजेएस), मा. सुरेशजी साळुंखे (प्रकल्प व्यवस्थापक तथा सदस्य, प्रबंध समिती, बीजेएस), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गायकवाड, NCC अधिकारी सब-लेफ्टनंट डॉ. शिवाजी सोनवणे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख सहा. प्रा. सिद्धेश्वर सांगोळे तथा विभागाचे विद्यार्थी यांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन संपन्न झाले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन संविधान व संविधानिक प्रक्रीयांबद्दल माहिती जाणून घेतली.

भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त **इंद्रायणी महाविद्यालय तळेगाव दाभाडे** येथे संविधान जागृतीसाठी वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी महाविद्यालयात संविधान दिनाचे आयोजन आले होते. त्यानिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिकरीत्या वाचन करण्यात आले होते. संविधानाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी घर घर संविधान हा उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयातील विदयार्थ्यांनी घरोघरी जाऊन भारतीय संविधानाची माहिती दिली. लोकांमध्ये संविधानाविषयी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात महाविद्यालयात साजरा करण्यात आला. २६ जानेवारी

या दिवशी महाविद्यालयातील प्राद्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विदयार्थी यांनी सामूहिकरीत्या उद्देशपत्रिकेचे वाचन केले. संविधानानुसार काम करण्याची शपथ घेतली.

फेब्रुवारी २०२५ मध्ये भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त महाविद्यालयात पोष्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विविध शाखांमधील १७ विदयार्थ्यानी त्यात सहभाग नोंदविला. उदा. संविधान सभा, मूलभूत हक्क, कर्तव्य भारतीय संसद राष्ट्रपति भवन, न्यायमंडळ इत्यादि महत्वाच्या संविधानातील थीम घेऊन विदयार्थ्यांनी पोस्टर्स तयार केले. तसेच भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये १०२ विदयार्थ्यांनी स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला होता.

संस्थेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विदयार्थी यांनी कार्यक्रमात मोलाचा सहभाग नोंदविला. संविधानाची मूल्य समाजात रुजविण्यासाठी संस्थेच्या व विदयार्थ्यांच्या वतीने वर्षभर खूप चांगले काम करण्यात आले.

**शारदाबाई पवार महिला आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज** यांच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये संविधानाच्या प्रस्तावनाचे सामूहिक वाचन रॅलीचे आयोजन करण्यात आले.

**अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात** भारतीय राज्यघटनेची 75 वर्ष व मानवी हक्क या विषयावर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेची ओळख याविषयी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय लोकशाहीय मुख्य शीर्षकाखाली महाविद्यालय मध्ये राज्यशास्त्री विभागाच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अमृतेश्वर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय विंजर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राज्यशास्त्री विभागाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**तुळजाराम चतुरचंद कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय बारामती** यांच्या वतीने भारतीय संविधानाची 75 वर्षे या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते तसेच भारतीय संविधान या विषयावर पोस्ट प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. आचार्य श्री

विकास प्रतिष्ठानचे पुरंदरचे शरदचंद्रजी पवार महाविद्यालय जेजुरी यांच्यावतीने राज्यघटनेची ओळख या विषयावर विद्यार्थ्यांनी निबंध लेखन केले. त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेवर आधारित प्रश्नमंजुषा कार्यक्रम घेण्यात आला. 17 मार्च 2025 रोजी मूलभूत अधिकार कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. 24 मार्च 2025 रोजी पोस्टर आणि भित्तीपत्रक स्पर्धेचे  आयोजन करण्यात आले यातून विद्यार्थ्यांना राज्यघटनेचे ज्ञान झाले व जाणीव जागृती झाली. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय लोणी काळभोर यांच्यावतीने राज्यशास्त्र  विभागाच्या वतीने संविधान पोस्ट प्रदर्शन ठेवण्यात आले होते. इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय इंदापूर यांच्यावतीने संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

**चांदमल ताराचंद बोरा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, शिरूर, जिल्हा पुणे**



घरांमध्ये संवैधानिक मूल्ये आणि जबाबदाऱ्यांबद्दल जागरूकता पसरविण्यासाठी चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) द्वारे "हर घर संविधान" मोहीम आयोजित करण्यात आली होती. या मोहिमेचा उद्देश लोकांना भारतीय संविधानात समाविष्ट असलेल्या मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि तत्त्वांबद्दल शिक्षित करणे, त्यांना ही मूल्ये त्यांच्या दैनंदिन जीवनात लागू करण्यास प्रोत्साहित करणे हा होता. या मोहिमेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून, संविधान आणि आधुनिक समाजात त्याची प्रासंगिकता याबद्दल सखोल ज्ञान देण्यासाठी डॉ. भैलुमे सर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. समारंभाचे अध्यक्ष म्हणून काम करणारे माननीय प्राचार्य डॉ. के.सी. मोहिते. या मोहिमेचा

उद्देश संवैधानिक हक्क, कर्तव्ये आणि मूल्यांबद्दल जागरूकता पसरवणे, व्यक्ती आणि कुटुंबांना ही तत्त्वे त्यांच्या दैनंदिन जीवनात समाविष्ट करण्यास प्रोत्साहित करणे हा होता.

**श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर** येथे दिनांक ॥ मार्च 12 मार्च रोजी राज्यशास्त्र



विभागातर्गत "घरघर संविधान" आणि "जागर संविधानाचा" हे कार्यक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत व्याख्यान व पोस्टर प्रदर्शन या दोन उपक्रमांचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून श्री प्रा. डॉ. श्रीरंजन आवटे सर यांनी संविधानाला 75 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विद्यार्थ्यांना संविधानाबद्दलची माहिती अगदी साध्या सोप्या भाषेत सांगितली. संविधानाचे ऐतिहासिक पार्श्वभूमी व महापुरुषांचे संविधानानिमित्त असलेले योगदान याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्यान संविधानाबद्दल आदर बाळगायला पाहिजे व तो आदर आपल्या कृतीतून दाखवून संविधान प्रत्येकाच्या घरोघरी पोहोचवले पोहोचवणे ही प्रत्येक विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे असे त्यांनी आपल्या व्याख्यानात मांडले. विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शन या स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेऊन संविधानातील व त्यांचे मान्यवरांसमोर सादरीकरण केले. कार्यक्रमांमध्ये पोवाडा, एकांकिका, मुटकोर्ट, नृत्य, गायन, कविता, नाटक इत्यादींचा समावेश करण्यात आला होता.

**नेताजी शिक्षण संस्था संचलित सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय, केडगाव** मधील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान गौरव महोत्सव (७५ वर्ष) साजरा करण्यात आला. या संविधान गौरव महोत्सवाच्या निमिताने राज्यशास्त्र विभागाच्या वतीने निबंध लेखन, घोषवाक्य, प्रश्नमंजुषा, संविधान उद्देशपत्रिका सामूहिक वाचन व राज्यघटनेसंबंधी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




संविधान गौरव महोत्सवाच्या निमिताने विविध शाखेतील विद्याथ्र्याच्या सहभागातून निबंध लेखनाची स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा व प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम संपन्न झाला. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दिनांक २१/०२/२०२५ रोजी "नागरिकांच्या जीवनात राज्यघटनेचे महत्व" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

**हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात** संविधान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून झाली. यामध्ये विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन समता, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य पांसारख्या मूल्यांची प्रतिज्ञा घेतली. यानंतर राज्यशास्त्र विभागातील डॉ. प्रभाकर जगताप यांचे "संविधान आणि आपण'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी संविधान जागरूकतेच्या महत्त्वावर भाष्य केले. संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून, ते आपल्या जीवनशैलीचा एक भाग आहे, असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे सखोल ज्ञान मिळवून समाजात संविधानिक मूल्यांचा प्रचार करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण झाली तसेच नागरिक म्हणून आपली जबाबदारी काय आहे, याविषयी स्पष्टता मिळाली. या उपक्रमातून



विद्यार्थ्यांनी लोकशाही, मूलभूत अधिकार, न्याय व्यवस्था आणि नागरी कर्तव्ये यांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे.

**वरवंड ग्राम शिक्षण संस्थेचे, एकनाथ सिताराम दिवेकर महाविद्यालय, वरवंड, ता. दौंड जि. पुणे** महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अनिल शितोळे उपस्थित होते. इतिहास विभागातील प्रा. डॉ. मारुती वाघमारे यांनी 'भारतीय संविधान निर्मिती' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. दत्तात्रय साळुंके यांनी भारतीय संविधानाचे वाचन केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रा. डॉ. नानासाहेब गोफणे प्रा. डॉ. किरण जाधव प्रा. डॉ. विनोद काकडे व विद्यार्थी उपस्थित होते.

**शंकरराव भेलके महाविद्यालयाच्या** वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत घरोघरी संविधान जनजागृती, प्रश्नमंजुषा स्पर्धा, महाविद्यालयाच्या दर्शनी भागात संविधान उद्देशिका प्रत लावण्यात आली, तसेच संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले

**विश्वासराव रणसिंग  महाविद्यालयाच्या** वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत घरोघरी संविधान जनजागृती, प्रश्नमंजुषा स्पर्धा, महाविद्यालयाच्या दर्शनी भागात संविधान उद्देशिका प्रत लावण्यात आली, तसेच संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले

*********

# संविधान गौरव महोत्सव अहवाल
# अहिल्यानगर जिल्हा

*********

**अहिल्यानगर जिल्हा समन्वयक म्हणून नियुक्ती केलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा यांचेकडे अहवाल सादर केलेल्या महाविद्यालयांची माहिती**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | संविधान गौरव महोत्सव- भारतीय राज्यघटना या विषयावरील विविध उपक्रमात सहभागी विद्यार्थी संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | विषय तज्ञांची व्याख्याने | निबंध व वकृत्व स्पर्धा | प्रश्न मंजुषा | पोस्टर / भित्ती पत्रके स्पर्धा | संविधान जनजागृती अभियान |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा. | ६५ | ३१ | १५० | -- | ३५ |
| २ | रा. ब. ना. बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर. | ८३ | -- | २८२ | -- | १३४ |
| ३ | दादा पाटील महाविद्यालय, कर्जत. | ७० | ११ | -- | -- | ४० |
| ४ | कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहुरी. | ४२ | ११७ | ७९ | ४७ | ६५ |
| ५ | एस.एस.जी.एम. महाविद्यालय, कोपरगाव. | -- | २५ | -- | २५ | ७० |
| ६ | पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर. | ७५ | ६५ | -- | -- | ५५ |
| ७ | सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर . | २५ | -- | -- | -- | ४५ |
| ८ | श्री आनंद महाविद्यालय, पाथर्डी. | ३५ | २७ | -- | ०९ | १५ |
| ९ | पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर. | ४५ | ३५ | ४५ | -- | ४८ |
| १० | न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर. | -- | -- | -- | -- | ४५ |
| ११ | राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहिल्यानगर | ७२ | ४० | ३०० | -- | ६५ |
| १२ | दादा पाटील राजळे महाविद्यालय, पाथर्डी. | ४२ | ३५ | ३५ | -- | २८ |
| १३ | सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिंपळगाव पिसा, श्रीगोंदा. | ६० | २६ | ६० | ४६ | ७० |
| १४ | कला व वाणिज्य महाविद्यालय, बेलापूर, ता. श्रीरामपूर. | ३५ | ३६ | ४२ | -- | ७२ |
| १५ | स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर. | ४५ | -- | -- | -- | ३५ |
| १६ | संगमनेर महाविद्यालय (स्वायत्त), संगमनेर. | १५० | -- | ८८ | -- | ७८ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १७ | अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर. | ७५ | ११९ | -- | -- | ८० |
| १८ | कला. विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहाता. | -- | १२ | -- | -- | ४२ |
| १९ | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर. | -- | २५ | २० | १० | ३६ |
| २० | रमेश फिरोदिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकुर. | ६२ | ४९ | २२ | १० | ८२ |
| २१ | के.जे.सोमय्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोपरगाव. | ७८ | -- | -- | ५३ | ७५ |
| २२ | कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार. ता. राहाता. | ६८ | २९ | १३८ | -- | ४८ |
| २३ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंडी, ता.अकोले. | ६५ | ३३ | ११४ | १६ | ५० |
| २४ | न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर. | ४५ | ७३ | ११९ | ५४ | २१० |
| २५ | जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, भेंडा. | ५५ | -- | ४५ | -- | ६८ |
| २६ | गृह विज्ञान व संगणक महिला महाविद्यालय, लोणी ता. राहाता. | -- | -- | -- | ३१ | ६८ |
| २७ | ॲड्.एम एन देशमुख महाविद्यालय राजुर ता. अकोले | २५ | १५ | १२ | -- | २३ |
| २८ | जामखेड कॉलेज, जामखेड | ८० | २२ | -- | -- | ५० |
| २९ | सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात महाविद्यालय संगमनेर | ५९ | ४० | -- | २४ | ४८ |
| ३० | श्री साईबाबा कॉलेज शिर्डी | ४२ | २३ | -- | १८ | ३० |
| ३१ | बाबूजी आव्हाड कॉलेज पाथर्डी | २२ | १८ | -- | -- | २० |
| ३२ | आबासाहेब काकडे महाविद्यालय बोधेगाव. | -- | -- | ३० | १५ | २८ |
| ३३ | महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा. | ११० | ३० | १३५ | ४५ | ७८ |
| ३४ | कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सोनई. | -- | २५ | १३० | -- | ४५ |
| ३५ | श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा. | ४५ | ०८ | -- | १० | ५३ |
| ३६ | श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा. | ३८ | २७ | ४५ | -- | ५२ |
| **एकूण सहभागी विद्यार्थी** | | **१७१३** | **९९६** | **१८९१** | **४१३** | **२०८६** |

**श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे,**

**श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,श्रीगोंदा जि. अहिल्यानगर.**

विविध विभागांच्या माध्यमातून उपक्रमांचे आयोजन करण्यात आले त्याचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

**१.भारतीय संविधानाचे पूजन व उद्देशिकेचे वाचन :**

भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त महाविद्यालयात **"संविधान गौरव महोत्सव"** या उपक्रमांतर्गत दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ठीक ११ वा. महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात भारतीय संविधानाच्या प्रतिमेचे पूजन करून संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शिवाजीराव नेटके यांनी राज्यघटनेच्या उद्दिशेकेतील मुद्यांचे विश्लेषण करून संविधानाविषयी माहिती दिली. त्यानंतर उद्देशिकीचे सामुहिक वाचन करण्यात आले.संविधान गौरव महोत्सव अहिल्यानगर जिल्हा समन्वयक डॉ. संदीप अभंग, डॉ. योगेश अहिरे, प्र. ग्रंथपाल प्रा. ईश्वर कणसे व ग्रंथालय स्टाफ तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी उपक्रमात सहभाग नोंदवला.



**२.भारतीय राज्यघटनेची ओळख व्याख्यान: डॉ. सुधीर वाडेकर, अहमदनगर महाविद्यालय**

भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागामार्फत **“संविधान गौरव महोत्सव”** या उपक्रमांतर्गत दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता **भारतीय राज्यघटनेची ओळख** या विषयावर **डॉ. सुधीर वाडेकर** अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. भारतीय संविधान हे केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नाही, तर ते आपल्या देशाच्या इतिहासाचे, संस्कृतीचे आणि मूल्यांचे प्रतीक आहे. ते आपल्याला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यांसारख्या महत्त्वाच्या मूल्यांची शिकवण देते. असे मत डॉ. सुधीर वाडेकर अहमदनगर महाविद्यालय यांनी व्यक्त केले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शिवाजीराव नेटके यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. कार्यक्रमासाठी प्रा. एस. आर. रसाळ, डॉ. संदीप अभंग, डॉ. सविता लोखंडे, डॉ. मुकुंद भोस, प्रा. मिलिंद बेडसे, प्रा. प्रवीण नागवडे व मोठया संख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.




भारतीय राज्यघटनेची ओळखया विषयावर डॉ. सुधीर वाडेकर अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना

भारतीय राज्यघटनेची ओळखया विषयावरील कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना प्रा. एस.आर.रसाळ.

**३.भारतीय राज्यघटनेची ओळख : निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धा**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागामार्फत **भारतीय राज्यघटनेची ओळख** या विषयावर निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धेचे दिनांक २३/०२/२०२५ ते २६/०२/२०२५ या दरम्यान आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत तर ६ विद्यार्थ्यांनी वकृत्व स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धेत सहभागी व विजेत्या स्पर्धकांना डॉ. सुधीर वाडेकर अहमदनगर महाविद्यालय यांच्या हस्ते गौरविण्यात आले.



निबंध व वकृत्व स्पर्धेत सहभागी व विजेत्या स्पर्धकांचा गौरव करतांना डॉ. सुधीर वाडेकर अहमदनगर महाविद्यालय, प्रा. एस.आर. रसाळ, प्रा. डॉ. शिवाजीराव नेटके व इतर मान्यवर

*********

**रयत शिक्षण संस्थेचे,**

**रा. ब.  नारायणराव बोरावके महाविद्यालय श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर.**

---




**१. भारतीय संविधान उद्देशिका वाचन:**

रा.से.यो. आणि ग्रंथालयाद्वारा ग्रंथालयाद्वारा आयोजीत भारतीय राज्यघटनेत समाविष्ट केलेल्या संविधान उद्देशिका स्मरणार्थ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.  घटनेच्या प्रस्तावनेबद्दल जागरुकता वाढवण्यावर, एकनिष्ठतेच्या वचनाचे महत्त्व आणि सामूहिक वाचन यावर या कार्यक्रमाचा भर होता.  सहभागींमध्ये घटनात्मक कर्तव्य आणि राष्ट्रीय अभिमान जागृत करणे हा उद्देश होता.

**२.भारतीय संविधानावरील राज्यस्तरीय प्रश्न मंजुषा स्पर्धा :**

आर.बी. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर येथील ग्रंथालय विभागाने भारतीय संविधानावर राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा आयोजित केली होती. एकूण २८२  स्पर्धाने स्पर्धेत सहभाग नोंदविला, ५० टक्के पेक्षा जास्त मार्कस् मिळविणाऱ्या स्पर्धकांची निवड करण्यात आली आणि त्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले . उपस्थितांना संवैधानिक तरतुदींची सखोल माहिती  प्राप्त झाली.



Rayat Shikshan Sanstha's
R. B. Narayanrao Borawake College Shrirampur
(Autonomous)
Dist. Ahilyanagari - 413709 (MS)
NAAC Re-Accredited 'A+' Grade with CGPA-3.44

State Level Quiz on Indian Constitution -2025
CERTIFICATE

This is to certified that, Mr./ Mrs./ Dr. / Prof . {{full name}} of {{other identifier}} has actively Participated in state level , "State Level Quiz on Indian Constitution- 2025 " and secure {{other identifier}}. The quiz program jointly organised by Department of Library and Internal Quality Assurance Cell of R.B. Narayanrao Borawake College Shrirampur, held on 17th to 28th February, 2025.

Dr. A.B. Anandkar
Librarian

Dr. B.D. Bankar
IQAC Coordinator

Dr. P. V. Badadhe
PRINCIPAL



पुण्य नगरी

# संविधान गौरव महोत्सवानिमित्त व्याख्यानास प्रतिसाद

**श्रीरामपूर :** संविधान गौरव महोत्सवानिमित्त येथील बोरावके महाविद्यालयात आयोजित भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि त्यांचे संरक्षण, या विषयावरील व्याख्यान नुकतेच पार पडले. त्यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला.

या व्याख्यानाचे प्रमुख व्याख्याते डॉ. बी. एस. तोंडे होते. तर अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. अनुप दळवी उपस्थित होते. यावेळी डॉ. एम. इ. औटी यांनीही भारतीय राज्यघटनेविषयी आपले विचार मांडले.

यावेळी डॉ. तोंडे यांच्या व्याख्यानातून संविधानातील मूलभूत हक्क, त्यांचे संरक्षण, तसेच न्यायालयाच्या भूमिकेवर विस्तृत चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत संविधानाविषयी अधिक जाणून घेण्याची जिज्ञासा दाखवली.

संविधान गौरव महोत्सवानिमित्त महाविद्यालयामध्ये प्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. बडधे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामध्ये संविधान सामूहिक वाचन, मूलभूत हक्क संरक्षणावरील विशेष व्याख्यान, संविधानावरील ऑनलाइन प्रश्नमंजुषा, संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन, संविधान पालनाबाबत सामूहिक शपथ, संविधान जनजागृती रॅली, पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा तसेच संविधानावर निबंध स्पर्धा या उपक्रमाचा समावेश करण्यात आला आहे.

या उपक्रमाद्वारे संविधानविषयीची जागरूकता निर्माण करण्याचा महाविद्यालयाचा उद्देश आहे. संविधान हा लोकशाहीचा आत्मा आहे आणि त्याचे पालन करणे प्रत्येक नागरीकांचे कर्तव्य आहे, हा संदेश या उपक्रमाद्वारे प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रारंभी डॉ. के. डी. थोरात यांनी प्रास्ताविक केले. डॉ. चेतना जाधव यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा. पी. एस. साळुंके यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा. के. के. अमोलिक, ग्रंथपाल ए. बी. आनंदकर, प्रा. पी. डी. सावळे, प्रा. एस चव्हाण व एनएसएस कमिटीतील इतर सदस्य उपस्थित होते. महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**रयत शिक्षण संस्थेचे,**

**दादा पाटील महाविद्यालय, कर्जत**

## संविधान जनजागृती : पथनाट्य



संविधान गौरव महोत्सवानिमित्त सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पथनाट्य हा एक यशस्वी आणि प्रभावी उपक्रम ठरला. या कार्यक्रमात १५ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला, तर प्रा. डॉ. प्रमोद परदेशी, प्रा. डॉ. रोडगे कैलास आणि प्रा. स्वप्निल म्हस्के यांच्यासह इतरांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन आणि सहकार्य केले.

**१. संविधान जनजागृती बाबत विशेष व्याख्यान:**

संविधान गौरव महोत्सवाच्या निमित्ताने महाविद्यालयात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रा. डॉ. डी. डी. शेंडे यांनी प्रमुख वक्ते म्हणून सहभाग घेतला आणि संविधानाच्या महत्त्वावर प्रकाश टाकणारे प्रेरणादायी व्याख्यान दिले. कार्यक्रमाला उप-प्राचार्य प्रा. डॉ. संजय ठुबे यांनी अध्यक्ष म्हणून उपस्थिती दर्शवली आणि




आपले मनोगत व्यक्त केले.

**२. निबंध स्पर्धा :**

संविधान गौरव महोत्सवानिमित्त सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजनायांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय राज्यघटना या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ११ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.भारतीय संविधानाच्या महत्त्वाला उजागर करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये त्याबद्दलची जाणीव वाढवणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

**३. संविधान उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन :**

महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव निमित्ताने सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, ग्रंथालय विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान उद्देशपत्रिका वाचनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .

**श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे,**

**लोकनेते रामदास पाटील धुमाळ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहुरी.**

**१.रांगोळी स्पर्धा :**

संविधान गौरव महोत्सवानिमित्त महाविद्यालयात ‘रांगोळी स्पर्धचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील एकूण ३४ विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे,

प्रथम क्रमांक: कार्तिक सर्जेराव तनपुरे, एम.एस्सी. भाग १, द्वितीय क्रमांक: कु. श्रुतिका राजेंद्र तमनर, बी.ए.भाग २ तृतीय क्रमांक: कु.पायल अजय केदारे, बी.ए.भाग २.






**२.पोस्टर स्पर्धा :**



संविधान गौरव महोत्सवानिमित्त **‘भारतीय राज्यघटना मुलभूत हक्क आणि कर्तव्ये’** या विषयावर राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, इतिहास व राज्यशास्त्र विभाग यांच्या सयुंक्त विद्यमाने**‘पोस्टर स्पर्धा’**आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयातील एकूण ४७ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सक्रीय सहभाग घेतला.

**३.निबंध स्पर्धा :**

महाविद्यालयातील एकूण ८३ विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला.






**४. प्रश्नमंजुषा स्पर्धा :**

संविधान गौरव महोत्सवानिमित्त **'भारतीय राज्यघटना'**या विषयावर **प्रश्नमंजुषा स्पर्धा** आयोजित करण्यात आली होती.महाविद्यालयातील एकूण ७९ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सक्रीय सहभाग घेतला. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. दत्तात्रय खिलारी, प्रा. विश्वजीत नन्नवरे आणि प्रा.मोनिका पवार यांनी काम पाहिले. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे, प्रथम क्रमांक: कु. श्रुतिका राजेंद्र तमनर, बी.ए.भाग २, द्वितीय क्रमांक: कु. सिद्धी विजय शेंडगे, बी.कॉम.भाग २, तृतीय क्रमांक: कु.स्वालेहा साजिद मणियार, बी.कॉम.भाग २.





**रयत शिक्षण संस्थेचे,**

**श्री.सद् गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव**

| अनु.क्रं. | कार्यक्रमाचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| १ | संविधान पूजन | २०/२/२०२५ |
| २ | उद्देशपत्रिकेचे वाचन | २०/२/२०२५ |
| ३ | भारतीय संविधान या विषयावर भित्तिपत्रिकेचे आयोजन | २४/२/२०२५ |
| ४ | निबंध स्पर्धेचे आयोजन | २५/२/ २०२५ |
| ५ | संविधान रॅलीचे आयोजन | २७/२/२०२५ |

**१.संविधान पूजन वउद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन:**

महाविद्यालयात दि.२० फेब्रुवारी २०२५ रोजी मा.प्राचार्य डॉ.माधव सरोदे यांचे हस्ते ग्रंथालयात संविधान पूजन करण्यात आले. याप्रसंगी सर्व स्टाफ उपस्थित होता.






मा.प्राचार्य यांनी भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेचे वाचन केले,यावेळी सर्व स्टाफ उपस्थित होता.

**२.भारतीय संविधान या विषयावर भित्तिपत्रिकेचे आयोजन:**

संविधान गौरव महोत्सवानिमित्त **भारतीय संविधान या विषयावर भित्तिपत्रिकेचे आयोजन** हा अनोखा असा उपक्रम घेतलेला असून यामध्ये जवळपास २५ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.




**३.निबंध स्पर्धेचे आयोजन :**

दि.२५ फेब्रुवारी २०२५ रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते,यास्पर्धेचे तीन विजेते पुढीलप्रमाणे:प्रथम क्रमांक-आहेर निकिता राजेंद्र (एफ.वाय.बी.एस्स.सी.), द्वितीय क्रमांक-खळे अश्विनी अण्णासाहेब (टी.वाय.बी.ए. राज्यशास्त्र), तृतीय क्रमांक – बनकर आस्था सुनील (एस.वाय.बी.ए.)

## ४.संविधान रॅलीचे आयोजन:






*********

**प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे,**
**पद्मश्री विखे पाटील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर**

## १.संविधानातील मुल्यांचा परिचय :



संविधान गौरव महोत्सवानिमित्त राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संविधानातील मुल्यांचा परिचय या कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला, तर प्रा. डॉ. ए.जी.सुर्यवंशी व प्रा.एल.एम.घोटेकर यांनी विद्यार्थ्यांच्या वेळेनुसार सर्व वर्गात जावून विद्यार्थ्यांना संविधानातील मुल्यांची जाणीव जागृती केली. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एम.दिघे व डॉ.आर.ए.पवार यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन आणि सहकार्य केले.



## २.भारतीय राज्यघटना विशेष व्याख्यान:

लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे,पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या निमित्ताने राज्यशास्त्र विभाग यांच्या वतीने एक विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रा. डॉ. व्ही.ए.खर्डे यांनी प्रमुख वक्ते म्हणून सहभाग घेतला आणि संविधानाच्या प्रस्तुतेवर प्रकाश टाकणारे प्रेरणादायी व्याख्यान दिले.

## ३.वक्तृत्व स्पर्धा आणि पारितोषिक वितरण:

संविधान गौरव महोत्सवानिमित्त राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत ६५ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.यावेळी प्राचार्य. डॉ. पी.एम.दिघे, यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. या स्पर्धेचे उप प्राचार्य प्रा. डॉ. शांताराम चौधरी यांनी मूल्यमापनाची जबाबदारी पार पाडली. भारतीय संविधानाच्या महत्त्वाला उजागर करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये त्याबद्दलची जाणीव वाढवणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.त्यानंतर कॅम्पस डायरेक्टर डॉ. आर.ए.पवार यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार वितरण करण्यात आले.

## ४. संविधान उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन:



प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.त्याचा भाग म्हणून राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान उद्देशपत्रिका सामुहिक

वाचनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रा. डॉ. ए.जी.सुर्यवंशी यांनी संविधानाची उद्देशपत्रिका वाचन करून त्याचे महत्त्व विशद केले.

## रयत शिक्षण संस्थेचे,
## चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

### १. संविधान उद्देशिका वाटप कार्यक्रम:

अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी भारतीय संविधान उद्देशिका वाटप करण्यात आले. त्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर उपस्थित होते.त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची निर्मिती व उद्देशिकेचे महत्व विशदकेले. डॉ.संतोष घंगाळे यांनी संविधान उद्देशिकेचे प्रकट वाचन करून विद्यार्थ्यांना त्याचे पालन करण्याची शपथ दिली.





स्वयंसेवक व छात्र सैनिकांना भारतीय संविधान उद्देशिकेचे वाटप करताना शिक्षक

*********

## श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे,

## श्री आनंद महाविद्यालय पाथर्डी

### १.संविधान गीताचे सादरीकरण:




संविधान गौरव महोत्सवानिमित्त, सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध कार्यक्रमाअंतर्गत श्री तिलोक जैन विद्यालयाच्या आनंद संगीत अकॅदमीच्या विद्यार्थ्यांनी संविधान गीताचे सादरीकरण केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शेषराव पवार, प्रो डॉ मुक्तार शेख, प्रा डॉ संजय नरवडे, सांस्कृतिक समन्वयक प्रा सुर्यकांत काळोखे, प्रो डॉ अनिल गंभिरे, प्रा डॉ बथुवेल पगारे तसेच महाविद्यालयातील ईतर प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. संविधान गीत सादरीकरण करताना श्री तिलोक जैन विद्यालयाच्या आनंद संगीत अकॅदमीचे विद्यार्थी

### २.वक्तृत्वआणि पोस्टर्स स्पर्धा :

संविधान गौरव महोत्सवानिमित्त, सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित




विविध कार्यक्रमाअंतर्गत भारताच्या संविधानावर आधारित वक्तृत्व स्पर्धा आणि पोस्टर्स स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. वक्तृत्व स्पर्धेमध्ये एकुण सात विद्यार्थ्यांनी तर पोस्टर्स स्पर्धेत ९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी प्रमुख पाहुणे प्रा श्रीकांत काळोखे, प्रो डॉ अनिल गंभिरे, सांस्कृतिक समन्वयक प्रा सुर्यकांत काळोखे, श्री गणेश कांबळे सर, कार्यक्रम अधिकारी प्रा




डॉ ईस्माइल शेख, प्रा डॉ जयश्री खेडकर, प्रा डॉ अजिंक्य भोर्डे, प्रा अमोल महाजन, प्रा गोविंद मामडे हेही ऊपस्थित होते.

भारताच्या संविधानावर आधारित वक्तृत्व आणि पोस्टर्स स्पर्धेचे काही छायाचित्रे

**३.भारतीय राज्यघटनेवर विशेष व्याख्यान:**

संविधान गौरव महोत्सवानिमित्त श्री तिलोक जैन उच्च माध्यमिक विद्यालयातील गाढे अभ्यासक प्रा.श्रीकांत काळोखे यांनी आपल्या भारतीय संविधानाबाबत सखोल मार्गदर्शन केले. प्रत्येक भारतीयाने संविधान समजून घेणे आवश्यक आहे. असे प्रा श्रीकांत काळोखे यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

**हिंद सेवा मंडळाचे**

**पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर**

**१ : संविधान उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन:**





संविधान गौरव महोत्सवानिमित्त महाविद्यालयातील संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. ज्योती बिडलान, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. कृष्णा पाटील, प्रा. शैलेश देशमुख, हिंदी विभाग प्रमुख डॉ नवनाथ भोंदे व विद्यार्थ्यांनी संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन केले.

**२.संविधान गौरव महोत्सव निमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा :**संविधानातील मुलभूत तत्वांची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी व त्यातून भारतीय संविधानाचे महत्व विद्यार्थ्यांच्या लक्षात यावे या हेतूने ‘**संविधान गौरव महोत्सव निमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा, २०२५**’ ही प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली.

### ३ : व्याख्यान - भारतीय संविधान व भारतीय लोकशाही

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'भारतीय संविधान व भारतीय लोकशाही' या विषयावर दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राज्यशास्त्र संशोधन केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. ज्योती बिडलान यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाचा उद्देश भारतीय संविधानाची लोकशाही संरक्षणातील भूमिका समजून सांगणे हा होता. संविधान भारतीय लोकशाहीचा कणा आहे आणि प्रत्येक नागरिकाने त्याच्या संरक्षणासाठी जागरूक राहिले पाहिजे, असा संदेश या व्याख्यानातून दिला. हे व्याख्यान अतिशय माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी होते. या व्याख्यानाला राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. कृष्णा पाटील, प्रा. शैलेश देशमुख, हिंदी विभाग प्रमुख डॉ नवनाथ भोंदे व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




व्याख्यात्या डॉ. ज्योती बिडलान व सहभागी विद्यार्थी

### ४ : निबंध लेखन स्पर्धा :

संविधान गौरव महोत्सवानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी १.भारतीय संविधान :२.भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षता ३.भारतीय संविधान आणि महिला सशक्तीकरण ४ .भारतीय संविधान गतिमान की स्थिर?या विषयांवर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली.या स्पर्धेत ३५ विद्यार्थी सहभागी झाले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. योगेश तवर यांनी काम पहिले. या स्पर्धेचे विजेते पुढील प्रमाणे : प्रथम क्रमांक : विशाल मोरे , द्वितीय क्रमांक : साक्षी साठे, तृतीय क्रमांक : ऋषिकेश शिंदे

*********




**अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,**

**न्यू आर्ट्स कॉमर्स ॲड सायन्स कॉलेज, पारनेर**

**१. संविधान उद्देशिका वाचन कार्यक्रम:**

अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, विद्यार्थी कल्याण मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात **गुरुवार दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी "संविधान गौरव महोत्सव" निमित्ताने** भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.







*********

**रयत शिक्षण संस्थेचे,**

**राधाबाई काळे महिला महाविद्यालय अहिल्यानगर**

**१. भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन:**

संविधान गौरव महोत्सवानिमित्त महाविद्यालयातील ग्रंथालयात भारतीय राज्यघटना या ग्रंथाचे पूजन आणि भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे मा. शिवाजी नाईकवाडी, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा ए. व्ही. गोरे, ग्रंथपाल डॉ. आर. एस. लवांडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. एस .एस ठुबे व इतर सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थिनींनी संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन केले.






संविधान गौरव महोत्सवानिमित्त संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करताना प्राध्यापक व विद्यार्थीनी

**२. व्याख्यान – भारतीय राज्यघटना आणि वास्तव परिस्थिती**

महाविद्यालयातील संविधान गौरव समिती आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "भारतीय राज्यघटना आणि वास्तव परिस्थिती" या विषयावर मा. शिवाजी नाइकवाडी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानात सरांनी भारतीय राज्यघटनेतील महत्वाच्या तरतुदी, मूलभूत हक्क आणि भारतीय संविधानाचे पालन व रक्षण करण्याचा महत्वाचा संदेश दिला. या व्याख्यानाला उपप्राचार्य डॉ. बी. एस. निकाळजे, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. ए. व्ही. गोरे, ग्रंथपाल डॉ. आर. एस. लवांडे, सांस्कृतिक विभाग

प्रमुख डॉ. एस .एस ठुबे व इतर सहकारी प्राध्यापक व विद्यार्थिनींची बहुसंख्येने उपस्थिती होती .






व्याख्यान देताना मा.शिवाजी नाईकवाडी सर व सहभागी विद्यार्थिनी

*********

**दादा पाटील राजळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आदिनाथनगर,**

महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभाग मार्फत दि. 22 फेब्रुवारी ते 27 फेब्रुवारी 2025 या कालखंडात भारतीय संविधान महोत्सव साजरा करण्यात आला. दि. 22 फेब्रुवारी 2025 रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख व्हावी. या उदेशाने ऑनलाइन प्रशन मंजूषा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयातील 35 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दि. 24 फेब्रुवारी 2025 रोजी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. संजय भराटे, डॉ. व्ही. बी. बनसोडे, श्री. कासार सर आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. प्रा. डॉ. व्ही. बी. बनसोडे यांचे भारतीय संविधान मूल्ये व तत्वे या विषयावर व्याख्यान दिले. दि. 27 फेब्रुवारी 2025 रोजी भारतीय संविधान आणि निवडणुका या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील 35 विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.







*********

**कुकडी एज्युकेशन सोसायटीचे**
**सावित्रीबाई कला महाविद्यालय पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर**

भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त “संविधान गौरव महोत्सव” अंतर्गत महाविद्यालयामध्ये फेब्रुवारी २०२५ मध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सदर उपक्रमाचे तपशील पुढीलप्रमाणे :

| दिनांक | उपक्रमांचा तपशील | आयोजक/ समन्वयक |
|---|---|---|
| 20/02/2025 | निबंध स्पर्धा | प्रा. जी. एस. दहिवले, डॉ. एस. आर. दूधकवडे |
| 21/02/2025 | ऑनलाइन प्रश्नमंजुषा | प्रा. जी. एस. दहिवले,.डॉ. एस. आर. दूधकवडे |
| 22/02/2025 | पोस्टर प्रेझेंटेशन | प्रा. जी एस दहिवले, प्रा. एस. के. थोरात, डॉ. एस. आर. दूधकवडे, डॉ. एन. डी. शितोळे |
| 24/02/2025 | व्याख्यान | प्रा. जी. एस. दहिवले, डॉ. एस. आर. दूधकवडे |

**१. निबंध स्पर्धा :**

“संविधान गौरव महोत्सव” अंतर्गत महाविद्यालयामध्ये दिनांक **20/02/2025** रोजी राज्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई कला महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने १.भारतीय राज्यघटनेचा विकास आणि निर्मिती प्रक्रिया २.भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क आणि कर्तव्ये ३.भारतीय ४. लोकशाही आणि राज्यघटनेची भूमिका ५.भारतीय राज्यघटना आणि स्थानिक स्वराज्य संस्था या विषयांवर
निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**२. ऑनलाइन प्रश्नमंजुषा :**

“संविधान गौरव महित्सव” उपक्रमा अंतर्गत दिनांक 21/02/2025 रोजी राजयशास्त्र विभाग आणि वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रश्नमंजुषेमध्ये सावित्रीबाई कला महविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील 60 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**३. पोस्टर प्रेझेंटेशन :**

“संविधान गौरव महोत्सव” उपक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये दि. 22/02/2025 रोजी एन एस एस विभाग, कला, वाणिज्य आणि विज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधान या विषयावर पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील एकूण 46 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट पोस्टर आणि सादरीकरण यांना प्रथम तीन क्रमांक काढण्यासाठी परीक्षक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डी एम शेटे, अंतर्गत गुणवत्ता विभाग प्रमुख डॉ एन डी वाजगे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ एस आय घेगडे सर यांनी भूमिका बजावली.

**४.व्याख्यान :**

संविधान गौरव महोत्सव अंतर्गत महाविद्यालयामध्ये दिनांक 24/02/2025, वार सोमवार रोजी राज्यशास्त्र विभाग आणि वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने **“भारतीय राज्यघटनेची ओळख”** या विषयावर श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा येथील

राज्यशास्त्र विभागप्रमुख प्राध्यापक डॉ शिवाजी नेटके सर यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. सदर कार्यक्रमासाठी एकूण 46 विद्यार्थी उपस्थित होते.

**संविधान शपथ वाचन करताना डॉ दूधकवडे सर व सर्व उपस्थित विद्यार्थी व**



**बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे**

**कला व वाणिज्य महाविद्यालय बेलापूर, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर**

बेलापुर एज्युकेशन सोसायटीचे कला व वाणिज्य महाविद्यालय बेलापुर महाविद्यालयात दि. २० ते २८ फेब्रूवारी २०२५ या दरम्यान घेण्यात आलेल्या संविधान गौरव महोत्सवाचा अहवाल पुढीलप्रमाणे

- गुरुवार दि. २० फेब्रूवारी २०२५ रोजी‘संविधानचे महत्व’ या विषयावर प्रा. डॉ. बाबासाहेब पवार, प्रा.डॉ.किशोर गटकळ या तज्ज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यानंतर संविधान जनजागृती मोहीमे अंतर्गत बेलापुर गावात प्रभात फेरी काढून संविधानचे पूजन व संविधानाचे सामुहिक वाचन करण्यात आले.
- दि.२४ फेब्रूवारी २०२५ रोजी भारतीय संविधानावर आधारित निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

दि. २५ फेब्रूवारी २०२५ रोजी संविधानवर आधारित रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

- गुरुवार दि. २७ फेब्रूवारी २०२५ रोजी संविधान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.
- शुक्रवार दि. २८ फेब्रूवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी व पालक मेळाव्यात सर्व स्पर्धांचे निकाल जाहीर करून बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत कोतकर, प्रा. रूपाली उंडे तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. बाबासाहेब पवार, प्रा. डॉ. किशोर गटकळ यांनी सदर उपक्रमाचे यशस्वी नियोजन केले





*********

**रयत शिक्षण संस्थेचे,**

**स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर**

| अनु.क्रं. | कार्यक्रमाचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| १ | संविधान आणि महिला विषयक कायदे ( अतिथी व्याख्यान ) | २४/२/२०२५ |
| २ | संविधान प्रतिज्ञा | २७ /२/२०२५ |
| ३ | भारतीय संविधान आणि मुलभूत हक्क ( अतिथी व्याख्यान ) | २७ /२/ २०२५ |

**१.संविधान आणि महिला विषयक कायदे ( अतिथी व्याख्यान ) :**

महाविद्यालयात दि.२४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रस्तुत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी गोविंदराव आदिक विधी महाविद्यालायातील डॉ. गीता शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षक यांना संविधान आणि महिलाविषयक कायदे या विषयावर मार्गदर्शन केले.




**२. संविधान प्रतिज्ञा :**

महाविद्यालयात दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी संविधान गौरव महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या प्रसंगी महाविद्यालायातील डॉ. विजय पाटोळे यांनी उपस्थित

विद्यार्थी शिक्षक, सर्व प्राध्यापक व कार्यालयीन स्टाफ यांना संविधानाची प्रतिज्ञा देण्यात आली.

**३.भारतीय संविधान आणि मुलभूत हक्क ( अतिथी व्याख्यान ) :**

महाविद्यालयात दि .२७ फेब्रुवारी २०२५ रोजी संविधान गौरव महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या प्रसंगी राव बहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालायातील प्रा.डॉ. बाबासाहेब तोंडे यांनी उपस्थित विद्यार्थी शिक्षक, सर्व प्राध्यापक व कार्यालयीन स्टाफ यांना भारतीय संविधान आणि मुलभूत हक्क या विषयावर अत्यंत मौलिक असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.




प्रा.डॉ. बाबासाहेब तोंडे भारतीय संविधान आणि मुलभूत हक्क या विषयावर मार्गदर्शन करतांना

*********

**शिक्षण प्रसारक संस्थेचे,**

**संगमनेर नगरपालिका कला, दा.ज. मालपाणी वाणिज्य आणि ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) संगमनेर, जि. अहिल्यानगर.**

**१. विशेष व्याख्यान: संविधनाच्या 75 वर्षांच्या वाटचालीचा आढावा**

शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर नगरपालिका कला, दा.ज. मालपाणी वाणिज्य आणि ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालयामध्ये (स्वायत्त) संविधान गौरव महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. डॉ. एस. ए. भोंग यांनी संविधनाच्या

75 वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेणारे प्रेरणादायी व्याख्यान दिले. कार्यक्रमास 150 विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

**२. संविधान उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन:**

राज्यशास्त्र विभागाद्वारा संविधान उद्देशपत्रिका सामूहिक वाचनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात उपप्राचार्य प्रो. डॉ .रविंद्र ताशीलदार यांनी संविधानाची उद्देशपत्रिका वाचन करून त्याचे महत्त्व विशद केले.या प्रसंगी राज्यशास्त्र विभागाचे डॉ. एस. ए. भोंग, डॉ. व्ही. ए . खरात , प्रा. एस. बी. शिरोडे , डॉ .एच. टी. कुरकुटे उपस्थित होते.




**३. ऑनलाईन प्रश्न मंजुषा:**

महाविद्यालयामध्ये (स्वायत्त) संविधान गौरव महोत्सवामध्ये ऑनलाईन प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. २० प्रश्नांचा समावेश असलेली लिंक विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली .सर्व विद्यार्थ्यांना राज्यघटनेचे स्वरूप वैशिष्ट्ये माहीत व्हावी याविषयी सदर उपक्रम घेण्यात आला .या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला . Link:https://forms.gle/PxYMM2N2iVWv1tih8

*********

## अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर

अहमदनगर महाविद्यालयाने भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त संविधान गौरव महोत्सव अंतर्गत प्रश्न मंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि व्याख्यान इ. कार्यक्रमाचे आयोजन मा. प्राचार्य डॉ.आर.जे.बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. महाविद्यालयाने २१ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेशी संबंधित प्रश्न मंजुषा स्पर्धाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत राज्यशास्त्र विभागातील प्रा.पूनम घोडके यांनी विद्यार्थ्यांना या विषयावर विविध प्रश्न विचारण्यात आले. या स्पर्धेत ३७ विद्यार्थी सहभागी झाले होते.




निबंध स्पर्धेचे आयोजन दि. २४ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. भारतीय राज्यघटनेची ओळख या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली.निबंध स्पर्धेत महाविद्यालयातील ६७ विद्यार्थ्यांनी सहभागी झाले.निबंध स्पर्धेत तीन नंबर काढण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन २५ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेत ५२ विद्यार्थी सहभागी आले होते. या स्पर्धेमध्ये पहिले तीन क्रमांक काढण्यात आले.



भारतीय राज्यघटनेची ओळख या विषयावर डॉ. सुधीर वाडेकर यांचे व्याख्यान दि.२६ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले.या व्याख्यानात भारतीय राज्यघटनेच्या विविध कलमांची माहिती देण्यात आली. या व्याख्यानासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय राज्यघटनेची ओळख या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. सुधीर वाडेकर

*********

**शिर्डी साई रुरल इन्स्टिट्यूटचे,**

**कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहाता**

**१. विशेष व्याख्यान:**

संविधान गौरव महोत्सवानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 27 फेब्रुवारी 2025 रोजी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाबद्दल जागरूक करणे आणि त्याच्या महत्त्वपूर्ण बाबींबद्दल माहिती देणे होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. विनोद सोनवणे यांनी संविधानाच्या तत्त्वज्ञान, उद्देशिका आणि महत्वाच्या मुद्द्यांवर विचार मांडले. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये संविधानाच्या महत्वाची जागरूकता निर्माण केली.




भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करताना उपस्थित विद्यार्थी व मान्यवर

**२.निबंध स्पर्धा:**

संविधान गौरव महोत्सवानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक 28 फेब्रुवारी 2025 रोजी राज्यशास्त्र विभागात निबंध स्पर्धेच्या आयोजन करण्यात आले **'माझा संविधान माझा अभिमान** या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. यात 12 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या उपक्रमात डॉ.रोहिणी कासार, प्रा. प्रणाली बोठे प्रा. शुभांगी जगताप यांनी सहकार्य केले.

डॉ.रोहिणी कासार विदयार्थ्यांना निबंध स्पर्धा विषयी मार्गदर्शन करताना.

*********

**रमेश फिरोदिया कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकुर ता. संगमनेर**

रमेश फिरोदिया कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,साकुर येथे 18 फेब्रुवारी 2025 ते 21 फेब्रुवारी 2025 या कालावधीत संविधान गौरव महोत्सवाचे आयोजन राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते. या महोत्सवाच्या निमित्ताने महाविद्यालयात निबंध व वकृत्व स्पर्धा, संविधानात्मक रांगोळी आणि पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, संविधान रॅली, संविधान शपथ व भारतीय राज्यघटना या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

- **निबंध स्पर्धेत** महाविद्यालयातील 29 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक कुसागर दिव्या बाबाजी हिने .ढेबंरे गौरी नवनाथ व द्वितीय क्रमांक कु. मिळविला.
- **वकृत्व स्पर्धेमध्ये** 12 विद्यार्थी सहभागी झाले होते प्रथम क्रमांक कुटेंगले कोमल . पुरी अर्पिता किसान हिने मिळविला.मैनाजी व द्वितीय क्रमांक कु.
- **संविधानात्मक रांगोळीमध्ये** 08 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला .प्रथम क्रमांक कुगाडेकर . संतोष डोखे पल्लवी.गायत्री संतोष व द्वितीय क्रमांक कु हिने मिळविला .
- **पोस्टर प्रेसेंटेशन** मध्ये10 विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. प्रथम क्रमांक कुकुरणे तेह्सीनजमीर  हिने मिळविला.सागर राखी नवनाथ व द्वितीय क्रमांक कु..

- **प्रश्नमंजुषा स्पर्धा** प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजक म्हणून प्रा नी कामयोगेश साळुंके यां . पाहिले. 22 विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला.
- **भारतीय राज्यघटना** या विषयावर प्राचार्या प्रोहेमलता .डॉ . राठोड यांनी सर्व विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले व संविधान शपथ दिली.
- **संविधान रॅलीचे आयोजन** महाविद्यालय ते बस स्टँड, चौफुली, ग्रामसचिवालय,मुख्य बाजारपेठ, दत्त मंदिर या मार्गे रॅली काढण्यात आलीसंविधान जागृती रॅ .लीमध्ये विद्यार्थ्यांनी भारत माझी माऊली संविधान त्याची सावली -, सबसे प्यारा संविधान हमारा, अन अभिव्यक्ती या घोषणा देऊन जनजागृती केली.




निबंध स्पर्धा




वक्तृत्व स्पर्धा



रांगोळी स्पर्धा



भित्तीपत्रक स्पर्धा

**के. जे. सोमय्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कोपरगाव**

**१. संविधान परिचय :**

दि . २२/ ०२/२०२५ रोजी के. जे. सोमय्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कोपरगाव, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राज्याशास्त्र विभागांतर्गत महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव अंतर्गत संविधानाचा परिचय हा उपक्रम राबविण्यात आला. या निमित्ताने राज्याशास्त्र विभाग प्रमुख प्रा. देवरे एस. एम. यांनी उपस्थितांना भारतीय घटनेच्या उद्देश पत्रिकेचा परिचय व तिचे महत्व विषद केले.



**२. माझे संविधान पोस्टर स्पर्धा :**

दि.२४/०२/२०२५ महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव अंतर्गत **'माझे संविधान'** या विषयावर पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रा. खोसे एम. बी. व प्रा. देवरे एस. एम. यांनी परिक्षक म्हणून काम पहिले. यामध्ये विविध विद्याशाखेतील एकूण ५३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.




**३. संविधानाचे महत्व विशेष व्याख्यान:**

दि.२७/०२/२०२५ रोजी महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव अंतर्गत संविधानाबाबत विद्यार्थ्यामध्ये जागृती व्हावी या उद्देश्याने **संविधानाचे महत्व** या विषयावर एक दिवसीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.प्रा. गायकवाड बी. एस. यांनी संविधानाचे महत्व विषद करतांना भारतीय लोकशाहीच्या बळकटीकरणामध्ये संविधानाचे योगदान सर्वश्रेष्ठ असल्याचे म्हटले.

**४. संविधान शपथ व संविधान गौरव महोत्सव समारोप :**

दि. २८ /०२/२०२५ रोजी के. जे. सोमय्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कोपरगाव, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राज्याशास्त्र विभागांतर्गत महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सवाचा समारोप संविधान शपथ घेऊन साजरा करण्यात आला.






संविधानाचे महत्व विशेष व्याख्यान संविधान शपथ घेतांना विद्यार्थी व प्राध्यापक

*********

**प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे,**

**कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार, ता. राहाता**

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार येथील राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने फेब्रुवारी २०२५ मध्ये संविधान गौरव महोत्सव साजरा करण्यात आला. या महोत्सवामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**१.निबंध स्पर्धा:**

मंगळवार दिनांक १८/०२/२०२५ रोजी सकाळी १०:३० वा. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी माझे **संविधान माझा अभिमान** हा विषय देण्यात आला होता.या स्पर्धेमध्ये २९ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.




'माझे संविधान माझा अभिमान' निबंध स्पर्धेची छायाचित्रे

**२.भारतीय संविधानाची प्रासंगिकता विशेष व्याख्यान :**

गुरुवार दिनांक २०/०२/२०२५कला ल्हारको ,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ,येथे **भारतीय संविधानाची प्रासंगिकता** या विषयावर प्रा.पी एस.औटी यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ७८ विद्यार्थी सहभागी झाले होते.





**३.संविधान प्रस्ताविकेचे वाचन व शपथ :**

शुक्रवार दिनांक २१/०२/२०२५ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी **संविधान प्रस्ताविकेचे वाचन व शपथ** हा उपक्रम घेण्यात आला .विद्यार्थी व विद्यार्थिनींनी व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले .




संविधान प्रस्ताविकेचे वाचन करून संविधान पालनाची शपथ घेतानाची छायाचित्रे

**४.संविधान जनजागृती ऑनलाईन प्रश्न मंजुषा :** १३८ विद्यार्थ्यांचा सहभाग


LOKNETE DR. BALASAHEB VIKHE PATIL
(PADMA BHUSHAN AWARDEE)
PRAVARA RURAL EDUCATION SOCIETY
ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE
KOLHAR
NAAC Accredited 'A' Grade
Tal. Rahata, Dist. Ahmednagar-413 710, Tel. No. (02422) 251669
Website : www.pravara.in, pravaracollege.in
E-mail : principal.asckolhar@pravara.in

राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग
भारतीय संविधान गौरव महोत्सव - फेब्रुवारी २०२५
प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की श्री./कु./ वैशाली बजरंग पवार यांनी लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधिने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार येथील राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागद्वारा भारतीय संविधान गौरव महोत्सव - फेब्रुवारी २०२५ निमित्ताने आयोजित भारतीय संविधान जनजागृती प्रश्नमंजूषा स्पर्धेत सक्रिय सहभाग घेतल्याबद्दल हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

प्रा. पी. एस. औटी
समन्वयक

डॉ. जी. डी. बोर्डे

डॉ. एच. आर. आहेर
प्राचार्य

e with Certify'em

*********

**भारतीय संविधान गौरव महोत्सव - फेब्रुवारी २०२५" निमित्ताने आयोजित भारतीय संविधान जनजागृती प्रश्नमंजूषा**

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधिने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, प्रवरानगर. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग, २०२४-२५ आयोजित "भारतीय संविधान गौरव महोत्सव - फेब्रुवारी २०२५" विद्यार्थी मित्रहो ! आपल्या देशाचा राज्य कारभार

docs.google.com

**जनसेवा फौंडेशन लोणी बुद्रुक**

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शेंडी (भंडारदरा) ता. अकोले.**

**उपक्रम १: निबंध स्पर्धा-**

दिनांक :- १७/०२/२०२५ संविधान गौरव महोत्सवानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. २२ विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत भाग घेऊन आपला सहभाग नोंदविला.








**उपक्रम २: पोस्टर स्पर्धा**

दिनांक :- १७/०२/२०२५ संविधान गौरव महोत्सवानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १६ विद्यार्थ्यांनी पोस्टर स्पर्धेत भाग घेऊन आपला सहभाग नोंदविला.

**उपक्रम ३ : ऑनलाइन व्याख्यान - भारतीय संविधानात नागरिकांची भूमिका**

मंगळवार दि. १८/ ०२/२०२५ रोजी **प्रा. तेलोरे भूषण व श्री. संकेत येलमामे** यांचे ऑनलाईन प्रणाली द्वारे **संविधानात नागरिकांची भूमिका** या विषयावर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन घेण्यात आले. यावेळी प्रा. तेलोरे भूषण यांनी भारतीय संविधानाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात सांगितले. तर गुरुवार दि. २०/ ०२/२०२५ रोजी श्री.धोंडीराम मधे यांनी **भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्क व कर्तव्य** या विषयावर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केले.





प्रा. तेलोरे भूषण  व श्री. संकेत येलमामे  **संविधानात नागरिकांची भूमिका** या विषयावर मार्गदर्शन करतांना

श्री.धोंडीराम मधे यांनी **भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्क व कर्तव्य** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना

**उपक्रम ४: ऑनलाइन संविधान प्रश्न मंजुषा-**

शुक्रवार  दिनांक- २१/०२/२०२५ रोजी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. प्रभाकर डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान प्रश्न मंजूषा ऑनलाईन स्वरूपात घेण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील श्री. बांगर आर. आर. व श्री. डगळे ए. एन. यांनी संविधानावर आधारित गूगल फॉर्मवर प्रश्नावली तयार करून विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाईन स्वरूपात पाठविण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील ११४  विद्यार्थ्यानी या संविधान प्रश्नमंजूषा मध्ये सहभागी झाले.

**उपक्रम ५: वकृत्व स्पर्धा -**

संविधान गौरव महोत्सवानिमित्त, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 1. भारतीय संविधान व आजची परिस्थिती 2. माझे संविधान माझा अभिमान या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. यामध्ये ११ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

**उपक्रम ६: संविधान जनजागृती मोहीम व संविधान उद्देशिकेचे वाचन**

मंगळवार दिनांक २५/०२/२०२५ रोजी महाविद्यालयात संविधान जनजागृती मोहीम व संविधान उद्देशिकेचे वाचन घेण्यात आले. याचबरोबर संविधानाची शपथ सर्व स्टाफ व विद्यार्थी यांनी घेतली.तसेच संविधानाची जनजागृती व्हावी यासाठी विद्यार्थ्यांना प्रभात फेरी काढून जनजागृती करण्यात आली.






संविधान शपथ घेतांना स्टाफ व विद्यार्थी     संविधान जनजागृती- प्रभात फेरी

*********

**अहमदनगर जिल्हा विद्याप्रसारक समाजाचे**
**न्यू आर्ट्स कॉमर्स अॅड सायन्स कॉलेज, पारनेर**





**दिवस पहिला-** दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता ग्रंथालयाच्या मुख्य इमारती समोर **"लोकशाही आठवडा"** या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रथम दिवशी महविद्यालयामध्ये प्रश्न मंजूषा स्पर्धा घेण्यात आली . त्यासाठी रेडियो सीटी 91.1 केंद्राच्या आर. जे. आकांक्षा स्पर्धकांना प्रश्न विचारण्यासाठी उपस्थित होत्या. प्रश्नमंजूषा या स्पर्धेसाठी एकूण ११९ विद्यार्थी उपस्थित होते . तर या खुल्या स्पर्धेमध्ये ८२ विद्यार्थ्यांनी आपला प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. या प्रश्न मंजूषास्पर्धेमध्ये भारतीय राज्यघटना , लोकशाही व प्रशासन यावर प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आले.

**दिवस दुसरा -** दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता ग्रंथालयाच्या मुख्य इमारती समोर **"टू द पॉइंट" – लाईव कार्टून मेकिंग अँड वन लायनर कॉम्पिटिशन** या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रामुख्याने लोकशाही आधारित व्यंगचित्र रंगवून त्यावर एक ओळीमध्ये लोकशाहीवरील संदेश विद्यार्थ्यांना द्यावयाचा होता. या स्पर्धेमध्ये एकूण **५४ स्पर्धक** सहभागी झाले होते.

**दिवस तिसरा -** दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता बायो-टेक्नॉलजी विभागाच्या सर होमी भाभा सभागृहामध्ये **"पिक अँड स्पीक" - उस्फूर्त स्पर्धा** या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रामुख्याने विदयार्थ्यांना समाजातील विविध

मुद्यांना निवडून त्या विषयावर ३ मिनिट बोलवायचे होते. या स्पर्धेमध्ये एकूण **३३ स्पर्धक** सहभागी झाले होते.




**दिवस चौथा -** लोकशाही आठवडाच्या चौथ्या दिवशी दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल मध्ये **"चारोळी स्पर्धा"** या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण **४० स्पर्धक** सहभागी झाले होते.

**दिवस पाचवा -** दिनांक ७ फेब्रुवारी २०२५ रोजी "**द्या मला संधी, करतो तुमची चांदी – नेतागिरी स्पर्धा**" या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रामुख्याने स्पर्धकांना नेता बनून वेशभूषासहित यायचे होते , त्यांचा पक्ष , पक्षाचा लोगो , ध्येय मांडायचे होते . या स्पर्धेमध्ये एकूण **०९ स्पर्धक** सहभागी झाले होते. तर यांना मतदान करण्यासाठी महाविद्यालयातील एकूण **२१० विद्यार्थी** उपस्थित होते.






**अहमदनगर जिल्हा विद्याप्रसारक समाजाचे**

**जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयं, भेंडे**

**१.प्रश्नमंजुषा:**

भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्ष पूर्तीनिमित्त संविधान गौरव महोत्सव अंतर्गत जिजामाता शास्त्र व कला महाविद्रयालयं भेंडे राज्यशास्त्र विभाग राष्ट्रीय सेवा योजना प्रश्नमंजुषा मध्ये दि.16/02/2025 ते दि. 22/02/2025 या काय्रक्रमांतर्गत सहभागी झालेल्या विदयार्थी व विदयार्थीनींना प्रमाणपत्र देण्यात आले.

**२.संविधान उद्देश पत्रिकेचे वाचन:**

श्री. मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय संविधान गौरव महोत्सव मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला. यानिमित्ताने राज्यशासत्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या संयुक्त विद्रयमाने संविधान उद्देशपत्रिका वाचन विशेष कार्यक्रम त्याचे महत्व विशद केले.



**३.विशेष व्याख्यान - संविधान आणि विज्ञान निष्ठा**

संविधान आणि विज्ञान निष्ठा या विषयावर डॉ. सुधाकर शेलार यांचे व्याख्यान झाले त्यांनी विज्ञान आणि संविधान निष्ठेचा स्विकार व्हावा या साठी समाजातील सर्व वर्गातील

लोकांनी आपले कार्य करावे. असे विचार मांडले. या कार्यक्रमासाठी ४५ विद्यार्थी उपस्थित होते.

********

**गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालय लोणी**

१. भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षांपूर्वी निमित्त संविधान गौरव महोत्सव अंतर्गत गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालय लोणी मध्ये दिनांक 24/ 02/ 2025 रोजी संविधानाची पूजन व उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी एकूण 84 विद्यार्थिनी उपस्थित होत्या तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

२. दिनांक 25 /02 /2025 रोजी संविधान गौरव महोत्सव निमित्त गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालयांमध्ये पोस्टर स्पर्धा घेण्यात आली त्यामध्ये एकूण 31 विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

विषय :- भारतीय संविधानाचे महत्त्व

३. दिनांक 27 /02 /2025 रोजी संविधानाची शपथ या कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते त्या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ अनुश्री खैरे यांनी भारतीय संविधान हक्क व अधिकार या विषयावर मुलींना मार्गदर्शन केले कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते तसेच एकूण 88 विद्यार्थिनी देखील सहभागी होत्या.

# संविधान गौरव महोत्सव नाशिक जिल्हा अहवाल

उपक्रमांमध्ये उपस्थित विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | अन्य उपक्रम | निबंध | वक्तृत्व | प्रश्न मंजुषा | व्याख्यान | पोस्टर | संविधान सामूहिक वाचन | विद्यार्थी सेमिनार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठा विद्या प्रसारक समाज यांचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, ओझर (मिग) | | १३ | १३ | १३ | | १३ | | |
| २ | कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,पिंपळगाव (ब.) | | २९ | १३ | ३२ | ६७ | | ८९ | |
| ३ | नूतन विद्या प्रसारक मंडळ यांचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, लासलगाव | | | | | | | ५० | |
| ४ | कर्मवीर गणपत दादा मोरे यांचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, निफाड | | १९ | | १०४ | १६५ | ८ | | |
| ५ | कर्मवीर आबासाहेब आनंदराव पाटील एल. एस. सोनावणे यांचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सटाणा | | | | | | | | |
| ६ | श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळ यांचे स्वामी मुक्तानंद कला आणि वाणिज्य महाविद्यालय, येवला | | २५ | २५ | | | | | |
| ७ | ग्राम सेवा मंडळाचे डॉ. विजय बिडकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, अकोले | | | | | | | | |
| ८ | कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कळवण (मानूर) | | १६ | | ६० | | | | |
| ९ | मराठा विद्या प्रसारक समाज यांचे कला आणि वाणिज्य महाविद्यालय, ताहाराबाद | | १०२ | | ३५ | | | | |
| १० | मराठा विद्या प्रसारक समाज यांचे के.आर.टी. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, वणी | | | | | | | | |
| ११ | महात्मा गांधी विद्या मंदिर यांचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मनमाड | | | १३ | १४ | | १९ | | |
| १२ | श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संचलित, कर्मवीर के. ह. आबाड कला, श्रीमान मो. गि. लोढा वाणिज्य व श्रीमान पी. एच. जैन विज्ञान महाविद्यालय,चांदवड | संविधान प्रती वाटप | | | | | | | |
| १३ | महात्मा गांधी विद्या मंदिर यांचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव शहर (सिटी कॉलेज) | ५०- कार्यशाळा | ९० | | | ५० | | | |
| १४ | मराठा विद्या प्रसारक समाज यांचे जी. एम. डी. कला, बी. डब्ल्यू. वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिन्नर | | १३ | | १७५ | | | | |
| १५ | जे. ए. टी. कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, (महिला महाविद्यालय) मालेगाव | | ४० | | | | २० | ४० | १५ |
| १६ | महात्मा गांधी विद्या मंदिर यांचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव | | | | | | | | |
| १७ | गोखले शिक्षण संस्था यांचे एच. पी. टी. कला व आर. वाय. के. विज्ञान महाविद्यालय, विद्यानगर, नाशिक | | ५५ | | | | | | |
| १८ | गोखले शिक्षण संस्था यांचे एन. बी. ठाकूर विधी महाविद्यालय , विद्यानगर, नाशिक | | | | | ४० | | | |
| १९ | गोखले शिक्षण संस्था यांचे बी. वाय. के. वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर | | | | | ५० | | | |
| २० | मराठा विद्या प्रसारक समाज यांचे कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, सिडको | ४०-विधान सभेला भेट | | | ४० | | | | |
| २१ | गोखले शिक्षण संस्था यांचे आर. एच. सापट कला, जे. डी. बिटको वाणिज्य व एन. एस. चांडक विज्ञान महाविद्यालय, नाशिक रोड. | | २१ | | १५ | | | | |
| २२ | मराठा विद्या प्रसारक समाज यांचे श्रीमती विमलाबेन खिमजी नेणुकाका कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, देवळाली कॅम्प | | | | ४० | | | | |
| २३ | मराठा विद्या प्रसारक समाज यांचे विठ्ठलराव गणपतराव होळे शिक्षण संस्था, नाशिक | | १२ | २० | ८३ | ३५ | | | |
| २४ | नवजीवन शिक्षण संस्था यांचे नवजीवन विधी महाविद्यालय | पंचवटी पोलिस स्टेशन क्षेत्र भेट | | | | | | | |
| २५ | छत्रपती शिक्षण संस्था एन. एस. के. कला वाणिज्य महाविद्यालय, नायगाव, सिन्नर | | १२ | १५ | १७ | | | | |
| २६ | मराठा विद्या प्रसारक समाज यांचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नांदगाव | संविधान शपथ | | | | | | | |
| २७ | वारागाव पिंपरी महाविद्यालय | | १२ | १५ | १६ | | | | |
| २८ | भोसला मिलिटरी कॉलेज नाशिक | | १८५ | | | | ११२ | | |
| २९ | कर्मवीर रामरावजी आहेर देवळा महाविद्यालय | | ३० | | ४० | | | | |
| ३० | दोंडी बुद्रुक महाविद्यालय | | १२ | १३ | १४ | | | | |
| ३१ | कला- वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इगतपुरी | | २० | | १५ | | | | |
| ३२ | यशवंतराव नाईक संस्थेचे दिंडोरी महाविद्यालय दिंडोरी | | | २१ | | | | | |
| ३३ | महिला महाविद्यालय नाशिक रोड | | | | ३० | | | | |
| ३४ | महिला महाविद्यालय मालेगाव कॅम्प | | १५ | | | | | | |
| ३५ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सालवेडा | | २० | | ४० | | | | |
| ३६ | महात्मा गांधी संस्थेचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, येवला. | | | ३० | | | | | |
| ३७ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदगाव | | ४५ | | ३० | | | | |
| ३८ | पंचवटी महाविद्यालय नाशिक | | ६० | ८५ | ७० | | | | |

भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल संविधान गौरव महोत्सव अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील ३३ महाविद्यालयांनी विविध प्रकारच्या स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी आयोजित करून अतिशय उत्स्फूर्त सहभाग घेतला.या अहवालामध्ये महाविद्यालयांनी जे उपक्रम आयोजित केले त्यांच्याविषयीचा अहवाल विभागीय सहसंचालक यांच्या वतीने पुढे सदर केला आहे.

**१ )मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक कर्मबीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक**

26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय राज्यघटनेचा मसुदा स्वीकारण्यात आला या घटनेला 26 नोव्हेंबर 2024 रोजी 75 वर्ष पूर्ण झाले आहेत. 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय राज्यघटना अमलात येऊन 26 जानेवारी 2025 रोजी या ऐतिहासिक घटनेला 75 वर्षे पूर्ण झाली आहेत. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी आमच्या कर्मवीर काकासाहेब वाघ, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पिंपळगाव बसवंत येथे फेब्रुवारी 2025 मध्ये "संविधान गौरव महोत्सव" साजरा करण्यात आला या महोत्सवाचा उद्देश राज्यघटनेतील मूलभूत मूल्यांचा पुनरुच्चार करून विद्यार्थ्यांना, नागरिकांना त्यांच्या घटनात्मक अधिकार व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे हा होता. यानिमित्ताने महाविद्यालयात संपूर्ण महिनाभर विविध कार्यक्रमांचे, स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धा आणि कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात मिळाला.

**१ प्रश्नमंजुषा :**

महाविद्यालयात सोमवार दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतीय राज्यघटनेवर आधारित प्रश्नमंजुषा विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये विद्यार्थ्यांना भारतीय राज्यघटनेवर आधारित विविध प्रश्न विचारण्यात आलेले होते ज्यामध्ये प्रामुख्याने भारतीय राज्यघटनेची निर्मिती आणि इतिहास, राज्यघटनेचे तत्वज्ञान, मुलभूत हक्क आणि कर्तव्ये, भारतीय राज्यघटनेतील विविधता आणि एकात्मता, राज्यघटनेशी संबंधित महत्वाची व्यक्तिमत्वे यावर आधारित प्रश्नांचा समावेश केला होता. ज्यामध्ये ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**२. वक्तृत्व स्पर्धा :**

महाविद्यालयात शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतीय राज्यघटनेवर आधारित वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये अ) "संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांचा आजच्या काळातील उपयोग" ब) "माझे संविधान माझा अभिमान" क) "लोकशाही आणि भारतीय संविधान" हे तीन विषय वकृत्व स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण 13 स्पर्धकांनी भाग घेतला आणि आपली वक्तृत्व कला सादर केली.

**३. निबंध स्पर्धा :**

संविधान गौरव महोत्सवा अंतर्गत शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयात निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते यासाठी विद्यार्थ्यांना अ) "संविधानातील मूलभूत अधिकार आणि त्यांचे महत्त्व" व) "संविधानाची अमृत महोत्सवी वाटचाल" क) "संविधान सशक्त करण्यासाठी युवकांची भूमिका" हे तीन विषय देण्यात आलेले होते या तीन पैकी एका विषयावरती विद्यार्थ्यांना पंधराशे शब्दांचा निबंध लिहिण्यास सांगितलेले होते. या स्पर्धेमध्ये एकूण 29 विद्यार्थ्यांनी भाग घेतला आणि आपले निबंध सादर केले. हे सर्व निबंध तपासून या स्पर्धेचा निकाल तयार करण्यात आला.

**४.तज्ञांचे व्याख्यान :**

संविधान गौरव महोत्सवा अंतर्गत महाविद्यालयात सोमवार दि. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. ज्ञानेश्वर सातभाई यांचे "भारतीय संविधानाची अमृत महोत्सवी वाटचाल" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यासोबतच डॉ. संदीप माळी यांचे "भारतीय संविधानाचा इतिहास" या विषयावरील व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. या दोन्ही व्याख्यानांमधून विद्याध्यर्थ्यांना भारतीय संविधानाचा इतिहास आणि संविधानाची आजपर्यंतची वाटचाल याविषयी मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन करण्यात आले या व्याख्यानासाठी ६७ विद्यार्थी उपस्थित होते.

**५. संविधानाचे सामुहिक वाचन :**

संविधान गौरव महोत्सवा अंतर्गत महाविद्यालयात गुरुवार दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून विद्यार्थ्यांना भारतीयसंविधानाची उद्देशिका आणि त्यातील संविधानाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करून सांगण्यात आले या उद्देशिका वाचनासाठी महाविद्यालयातील 89 विद्यार्थी उपस्थित होते.

**२) स्वामी मुक्तानंद कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयामध्ये** संविधान गौरव महोत्सव अंतर्गत वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये 25 विद्यार्थी विद्यार्थिनी सहभाग घेतला. तसेच निबंध स्पर्धा देखील आयोजित करण्यात आल्या होत्या यातही 25 विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

**मविप्र समाज्याचे कला वाणिज्य आणि विज्ञान महविद्यालयात ताहाराबाद** येथे महाराष्ट्र शासनसहसंचालक उच्च शिक्षण पुणे विभाग यांच्या परिपत्रकान्वये भारतीय राज्यघटनेची ७५ वर्षपूर्ती निमित्त संविधान गौरव महोत्सव फेब्रुवारी साजरा करण्यात आला. या महोत्सव अंतर्गत महाविद्यालयात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या आदेशाने २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाले त्या अनुषंगाने 'संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२०२५" साजरा करण्याचा निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सूचित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने महविद्यालय प्रांगणात संविधान प्रास्ताविक (उद्देश्पात्रिका) चा फ्लेक्स लावण्यात आला. तसेच संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन प्रा, अनिल पाटील यांनी करून घेतले. मा. प्राचार्य व्ही. वी. काळे, उपप्राचार्य डी.जी. भामरे, नॅक समन्वयक प्रा.एस.वी. महाले यांनी संविधानाचे पूजन केले. यानंतर विद्याथी प्राध्यापक आणि प्रध्यापाकेत्तर कर्मचारी यांनी संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक बाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा समन्वयक अमोल तिसगे यांनी केले तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गणेश लिंबोळे यांनी आभार मानले.दि.२०/०२/२०२५ ते २६/०२/२०२५ या काळात संविधान गौरव उपक्रमांतर्गत महाविद्यालयात व्याख्यान, निबंध स्पर्धा आणि ऑनलाईन प्रत्रमंजुष्याच्या आयोजन

करण्यात आले होते. दि २५/०२/२०२५ रोजी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गणेश लिंबोळे पांचे व्याख्यान आजोजित करण्यात आले होते. त्यांनी आपल्या व्याख्यानात भारतीय संविधानाला 75 वर्ष पूर्ण झाले असून वैश्विक पातळीवर संसदीय लोकशाही, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या मूल्य पातळीवर भारतीयराज्यघटना ही जगभरातल्या नवीन देशांना मार्गदर्शन करीत आहे. देशाच्या विकास प्रक्रियेत सामाजिक आर्थिक राजकीय सांस्कृतिक सर्व पातळीवरती राज्यघटना निर्णायक ठरली आहे. आज भारताच्या विकासात भारतीय राज्यघटनेचे योगदान अतुलनीय आहे. भारतीय नागरिकांना मुलभूत अधिकार देवून त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी भारतीय संविधानाने सर्वोच्च न्यायालयाच्या अधीन ठेवले आहे. याबरोबर भारतीय संविधान नागरिकांना मुलभूत कर्तव्य देवून त्यांची जबाबदारी व राज्याला मार्गदर्शन करण्यासाठी नीती निर्देशक तत्वाची मांडणी केली आहे जगातील सर्वोत्तम संविधान भारताचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा.डी.जी. भामरे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाच्या कर्तव्य पालनाचा आग्रह करून विद्यार्थ्यांनी चांगला नागरिक म्हणून आपली ओळख निर्माण करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास IQAC समन्वयक प्रा. सोमनाथ महाले प्रा. अनिल पाटील डॉ.ए.आर. फुलारी, प्रा.बी.बी. शिंगाडे, प्रा.एस.बी.गांगोडे, प्रा.के.पी.भदाणे, प्रा.पी.सी.राउत, प्रा.ए.आर. बागुल, प्रा.यु.एम.पाटोळे, प्रा.पी.सी. बागुल, प्रा एल.आर. बोरसे, प्रा. सुविधा देवरे, प्रा. सपना खोंडे, प्रा. साक्षी आहिरे, प्रा. अश्विनी बोरस्ते, प्रा. वसुंधरा देवरे, प्रा.व्ही.एस. रौंदळ, कार्यलयीन कर्मचारी शरद मोरे, किशोर धोंडगे, शेरोन शेख, निलेश देसले, भीमराव खांडवी, शरद माळी, हिरामण बहिरम, मन्सुरी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

संविधान गौरव महोत्सव उपक्रमांतर्गत महाविद्यालयात निबंध स्पर्धा आणि ऑनलाईन प्रश्नमंजुष्याच्या आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातल्या एकूण 35 विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत भाग घेतला. विद्यार्थ्यांमधून व प्राध्यापकांमधून प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले या सर्व विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांचा महाविद्यालयाच्या वार्षिक गुणगौरव समारंभात प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ऑनलाईन प्रश्नमंजुषा मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यामध्ये देखील प्रथम तीन क्रमांकांना पारितोषिक देण्यात आले. या ऑनलाइन प्रश्नमंजुषा मध्ये १०२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे.

**३) मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वणी, ता. दिंडोरी**

येथे भारतीय संविधान अमृत महोत्सवाच्या निमित्ताने निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यात तीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच वक्तृत्व स्पर्धेत आठ विद्यार्थ्यांनी तर संविधान जनजागृती कार्यक्रमात 82 विद्यार्थी सहभागी झाले होते. संविधान जनजागृती प्रभात फेरीमध्ये 62 विद्यार्थी तर संबिधान कार्यशाळेत 49 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या निमित्ताने संविधान जनजागृती प्रत्रमंजुषा स्पर्धा आयोजित केली होती यात 34 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला

**४)महात्मा गांधी विद्यामंदीर संचालित, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मनमाड येथे**

२६ फेब्रुवारी २०२५ रोजी संबिधान गौरव महोत्सवानिमित विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत तीन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होतेः प्रश्नमंजूषा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि पोस्टर सादरीकरण स्पर्धा. या कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण विठ्ठल पाटील, उपप्राचार्य डॉ. बी. एस. देसले तसेच शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. डी. व्ही. सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. या सर्व कार्यक्रमांचे समन्वयक प्रा. एस. ए. वाघ होते, तर आयोजन समितीत डॉ. आर. ए. जाधव आणि डॉ. व्ही. जी. राठोड यांनी योगदान दिले.प्रश्नमंजुषा स्पर्धेचे दोन फेऱ्यांमध्ये आयोजन करण्यात आले. पहिली फेरी ऑनलाइन स्वरूपात घेण्यात आली होती आणि ती विद्यार्थ्यांसाठी केवळ १० मिनिटांसाठी सुरु होती. या फेरीत ११४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी १५ विद्यार्थ्यांची पुढील ऑफलाइन फेरीसाठी निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांचे ५ संघ तयार करण्यात आले प्रत्येक संघात ३ विद्यार्थी होते. वरील विद्यार्थ्यांची एकूण पाच फेरीमध्ये स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये सामान्य जान फेरी, रापिड फेरी, संगीत फेरी बजर फेरी इत्यादी फेरींमध्ये स्पर्धा घेण्यात आली आणि अंतिम गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

**वक्तृत्व स्पर्धा**

युवक बिरादरीच्या सहकार्याने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी संविधानाशी संबंधित विविध विषयांवर प्रभावी वक्तृत्व सादर केले. सदर स्पर्धेमध्ये 13 विध्यार्थ्यांनी भाग घेतला.

**पोस्टर सादरीकरण स्पर्धा**

पोस्टर सादरीकरण स्पर्धेत विद्यार्थ्यांनी संविधानाशी संबंधित विविध संकल्पनांचे सर्जनशील सादरीकरण केले. या स्पर्धेच्या माध्यमातून संविधानाच्या महत्त्वावर प्रकाश टाकण्यात आला. सदर स्पर्धेमध्ये 19 विध्यार्थ्यांनी भाग घेतला.

**५) महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय निमगाव** येथे संविधान महोत्सव आयोजित करण्यात आला होता. निबंध स्पर्धा पोस्टर्स स्पर्धा प्रत्रमंजुषा वक्तृत्व आणि काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**६) गोखले एज्युकेशन सोसायटीच्या बी.वाय. के सिन्नर वाणिज्य महाविद्यालयांमध्ये** संविधान अमृत महोत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहकायनि विविध व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

**७) मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कर्मवीर शांताराम बापू वावरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सिडको येथे** देखील प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. आपल्या विद्याथ्यांना विधिमंडळाच्या कामकाजाचा परिचय बाबा म्हणून महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेला विधानसभेला 40 विद्यार्थ्यांसह राज्यशास्त्र विभागाने भेट दिली. भारतीय संविधान तयार करण्यावर आधारित दूरचित्रवाणी मिनी मालिका देखील विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली.

**८) मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय देवळाली कॅम्प** यांनी देखील संविधान गौरव महोत्सवाचे आयोजन केले होते. ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धा भारतीय संविधानातील मूल्य विषयावर व्याख्यान निबंध स्पर्धा या स्वरूपाचे कार्यक्रम आयोजित केले होते.

**९) मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या ऍडव्होकेट विठ्ठलराव हांडे शिक्षण शाख महाविद्यालयामध्ये** संविधान गौरव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय स्वातंत्र्याची चळवळ आणि त्यातून प्राप्त झालेले प्रजासत्ताक राज्य व हे राज्य ज्या ग्रंथावर आधारित आहे अशा भारतीय राज्यघटनेच्या विचारांचा जागर करणारे भारतीय राज्यघटनेचा विस्तृत उहापोह करणाऱ्या दोन व्याख्यानांचे महाविद्यालयातर्फे आयोजन करण्यात आले होते. पहिले व्याख्यान दिनांक 17 फेब्रुवारी 2025 रोजी एडवोकेट डॉक्टर समीर चव्हाण महाविद्यालय नाशिक यांचे होते त्यांनी भारतीय राज्यघटनेतील विविध कलमे व कायदे यावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले त्याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते त्याचबरोबर व्याख्यानाचे दुसरे पुष्प प्रोफेसर डॉक्टर विद्या जाधव यांनी दि. 20 फेब्रुवारी 2025 रोजी गुंफले.

**उपक्रम क्रमांक :** 2 - भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षपूर्ती निमित्त संविधान गौरव निबंध लेखन स्पर्धाभारतीय राज्यघटनेतील विचार विद्यार्थ्यांमध्ये प्रतिबिंबित व्हावे त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी वाचन करावे या पार्श्वभूमीवर संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त विद्यार्थी शिक्षकांसाठी निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली त्यासाठी अर्थातच भारतीय राज्यघटनेची 75 वर्षे आणि आपण' हा विषय निश्चित करण्यात आला

**उपक्रम क्रमांक**: 3 - भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षपूर्ती निमित्त संविधान गौरव वक्तृत्व स्पर्धा

**उपक्रम क्रमांक**: 4 - भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षपूर्ती निमित्त संविधान गौरव प्रश्न मंजुषा स्पर्धा

**उपक्रम क्रमांक**: 5 - भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षपूर्ती निमित्त संविधान गौरव निमित्ताने भित्ती पत्रक /पोस्टर प्रेझेन्टेशन स्पर्धा

**१०) नवजीवन एज्युकेशन सोसायटीच्या नवजीवन विधी महाविद्यालय मध्ये** मान्यवरांची व्याख्याने, विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र तसेच क्षेत्रभेट म्हणून पंचवटी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन कार्यक्रम घेण्यात आला. धनलक्ष्मी शिक्षण संस्था संचलित सहकार मित्र शिवाजीराव कातकडे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नायगाव, तालुका, सिन्नर

येथे देखील संविधान गौरव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले होते.

**११) साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ नाशिक रोड संचलित कला व वाणिज्य महाविद्यालय बारागाव पिंपरी** यांनी देखील संविधान महोत्सवाचे आयोजन केले होते. निबंध स्पर्धा प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि पोस्ट प्रेझेंटेशन स्पर्धा यानिमित्ताने आयोजित केली होती.

**१२) भोसला मिलिटरी कॉलेज नाशिक मध्ये** देखील संविधान गौरव महोत्सव भव्य प्रमाणात आयोजित करण्यात आला होता. भारतीय संविधानाचे महत्त्व या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत 185 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. आपली संविधान आपला आत्मसन्मान या विषयावरील पोस्टर स्पर्धेत 112 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. संविधानात्मक नैतिकता या विषयावर व्याख्यान देखील या निमित्ताने आयोजित करण्यात आले होते.

**१३)कर्मवीर रामरावजी आहेर महाविद्यालय देवळा** यांनी संविधान महोत्सवानिमित्त वक्तृत्व स्पर्धा निबंध स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

**१४)कला वाणिज्य महाविद्यालय दोडी बुद्रुक तालुका सिन्नर यांनी** संविधान गौरव महोत्सवानिमित्त वक्तृत्वस्पर्धा निबंध स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

**१५) कर्मवीर पुंजा बाबा गोवर्धने कलाव आणि जे विज्ञान महाविद्यालय इगतपुरी** येथे संविधान महोत्सवाच्या निमिताने फिल्म महोत्सव तसेच साहित्याने पुनर्वलोकन विविध प्रकारच्या सर्वे निबंध स्पर्धा आणि शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या होत्या.

**१६) क्रांतिवीर वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्या कला वाणिज्य महाविद्यालय दिंडोरी** यांनी संविधान गौरव महोत्सवाच्या निमित्ताने पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे तसेच निबंध स्पर्धेचे मोठ्या प्रमाणात आयोजन केलं होत.नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाने बिंदू देशमुख महिला महाविद्यालयात विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आले.

**१७) महात्मा गांधी संस्थेच्या पुष्पाताई महिला महाविद्यालयांमध्ये** संविधान महोत्सवाचे निमित्ताने निबंध स्पर्धा प्रश्नमंजुषा स्पर्धेने भित्तिपत्रके सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

**१८) महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येवला** यांनी संविधान महोत्सवाच्या निमित्ताने निबंध स्पर्धा भितीपत्रिका सादरीकरण स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली होती तसेच विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान देखील आयोजित केले होते.

**१९) मराठी विद्या प्रसारण संस्थेच्या कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सायखेडा** येथे देखीन विद्यार्थ्यांसाठी भारतीय संविधानावर प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

**२०) महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित पंचवटी महाविद्यालय** येथे व निमित्ताने घरोघरी हस्त पुस्तिका वाटून संविधानाची जनजागृती करण्यात आली.



कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नांदगाव येथे संविधान शपथ घेताना विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि प्राध्यापक बंधू भगिनी



देवळा येथील कर्मवीर आहेर महाविद्यालयात संविधान महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धे प्रसंगी प्राचार्य हितेंद्र आहे आणि यशस्वी विद्यार्थी




वसंतराव नाईक महाविद्यालय दिंडोरी यांनी संविधान गौरव महोत्सव अंतर्गत आयोजित केलेल्या पोस्टर्स स्पर्धेत प्रसंगी प्राचार्य राजेंद्र सांगळे आणि सहकारी




चांदवड येथील आबड लोढा जैन महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव अंतर्गत व्याख्यान देतांना प्रोफेसर तुषार चांदवडकर, समवेत प्राचार्य दत्ता शिंपी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. प्रदीप बेताळ




**२१) म.वि.प्र समाजकला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय ओझर, मिग** यांनीभारतीय राज्यघटनेची जागृती व्हावी त्यासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा. वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पोस्टर व भित्तिपत्रिका स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले.

**२२) मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालय निफाड**

येथे राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी संविधानाची उद्देशिकेचे - सामूहिक वाचन करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख प्रा. अभय वडपुले

याप्रसंगी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर मोगल यांनी केले. उपस्थितांचे आभार राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. महेंद्र पवार यांनी मानले. संविधानाप्रती आपली निष्ठा व्यक्त करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. अभय बडघुले, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. प्रवीण ढेपले, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.बी बी. मुन्तोडे, विद्यार्थी विकास मंडळ अध्यक्ष प्रा.पी.पी. शार्दुल, प्रा श्रीमती व्ही. बी. गीते, प्रा. सूर्यवंशी प्रा. मोगल एनसीसी प्रमुख पाटील सर, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी याप्रसंगी बहुसंख्येने उपस्थित होते.



**२३) कर्मवीर आबासाहेब तथा ना.म. सोनवणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सटाणा.** येथील राज्यशास्त्र विभागातर्फे "संविधान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांमध्ये संविधाना बद्दल जाणीव निर्माण व्हावी आणि संविधानांच्या मुल्यांची जोपासना व्हावी


संविधानाच्या प्रास्ताविकाचे पुजन करतांना विध्यार्थी, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी


संविधानाची प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन करतांना

यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना म्हणून भारतीय संविधानाकडे पाहिले जाते.



२४) **कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कळवण (मानूर)**

महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागा तर्फे भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त "संविधान गौरव महोत्सव" • साजरा करण्यात आला. या महोत्सवांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयातील सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी "भारतीय राज्यघटनेची ओळख" या विषयावर निबंध स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

निबंध स्पर्धा- एकूण १६ विद्यार्थी सहभागी

प्रश्नमंजुषा स्पर्धा - एकूण ६० विद्यार्थी सहभागी




संविधान गौरव महोत्सव अंतर्गत व्याख्यान देताना राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.गणेश लिंबाळे




संविधान गौरव महोत्सव अंतर्गत व्याख्यान प्रसंगी उपस्थित विद्यार्थी

**२५ ) श्री. नेमिनाय जैन ब्रह्मचर्याश्रम संचलित,कर्मवीर के. ह. आबड कला, श्रीमान मो. गि. लोढा वाणिज्य व श्रीमान पी. एच. जैन विज्ञानमहाविद्यालय, चांदवड जि. नाशिक**

संविधानाविषयी विद्यार्थ्यांमध्ये आदरभाव वृद्धींगत होण्यासाठी तसेच संविधानाविषयी जनजागृती होण्यासाठी दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पी. यू. वेताळ यांनी केले. प्रास्तविकात प्रा. पी. यू. वेताळ यांनी संविधान अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासंदर्भात माहिती करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोज पाटील सर होते. अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य डॉ. मनोज पाटील सरांनी भारतीय राज्यघटनेतील मूल्यांविषयीचे महत्व अधोरेखित केले.

**२६) एमजीव्ही'ज कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय मालेगाव शहर**

विविध कार्यक्रमांचे आयोजन



**२७) मराठा विद्या प्रसारक समाजाचे गुरूवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर, जि. नाशिक** यांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.






२८) **मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्रीमती विमलाबेन खिमजी तेजू काया आठ सायन्स अँड कॉमर्स कॉलेज देवळाली कॅम्प** यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.




महाविद्यालयातील दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला.




१९ फेब्रुवारी २०२५ रोजी संविधान गौरव महोत्सव कार्यक्रमच्या निमित्ताने आमच्या महाविद्यालयात “भारतीय संविधानातील मुल्ये” विषयावर प्रा.जावेद शेख यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले.

**२९) जे.ए.टी. कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (महिलांसाठी) मालेगाव नाशिक** विविध कार्यक्रम  आयोजित केले.






**३०) के. टी. एच. कला. वाणिज्य विज्ञान महाविद्यालयामध्ये** विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. दि.26/11/2024 रोजी महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आले. संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात संविधान वाचन तसेच व्याख्यान

आयोजित करण्यात आले. या व्याख्यानेचा उद्देश विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व गुणात विकास व्हावा, आणि त्यांच्या जीवनावर चांगला विद्याररांचे प्रभाव पडावा, या उद्देशाने हा दिवस साजरा करण्यात आला, संविधान गुण गौरव महोत्सव अंतर्गत विविध स्पर्धा दि.२१/०२/२०२५ ते २८/०२/२०२५ या कालावधीत घेण्यात आल्या. यामध्ये निबंध स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, आणि वकृत्व स्पर्धा यांचेही आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या सर्व विभाग शाखेच्या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला जवळजवळ शंभर ते दीडशे विद्याथ्यांनी या विविध कार्यक्रमांमध्ये आपला सहभागी नोंदविला.

३१) **के. के. एच. आबड कला व वाणिज्य महाविद्यालय, चांदवड, जि. नाशिक** महाविद्यालयाने विविध कार्यक्रम आयोजित केले.

३२) **गोखले एज्युकेशन सोसायटी संचालित आर. एन. सी. कला, जे. डी. बी. वाणिज्य आणि एन. एस. सी. विज्ञानमहाविद्यालय, नाशिक रोड, नाशिक** यांच्या वतीने महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी निबंध स्पर्धा,ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धा उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.



**३३) गोखले एज्युकेशन सोसायटी संचालित आर. एन. सी. कला, जे. डी. बी. वाणिज्य आणि एन. एस. सी. विज्ञान महाविद्यालय, नाशिक रोड, नाशिक - ४२२००१** महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला.

**३४) कला आणि वाणिज्य महाविद्यालय ,दिंडोरी** यांच्या वतीने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.





वसंतराव नाईक महाविद्यालय दिंडोरी यांनी संविधान गौरव महोत्सव अंतर्गत आयोजित केलेल्या पोस्टर्स स्पर्धेत प्रसंगी प्राचार्य राजेंद्र सांगळे आणि सहकारी



चांदवड येथील आबड लोढा जैन महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव अंतर्गत व्याख्यान देतांना प्रोफेसर तुषार चांदवडकर, समवेत प्राचार्य दत्ता शिंपी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. प्रदीप वेताळ

**३५) नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय,नाशिकरोड** महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग व विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना आयोजित भारतीय संविधानाचे अमृत महोत्सव या अंतर्गत भारतीय संविधान या विषयावर एक दिवसीय व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यान एच आर्ट्स व आ रवायके सायन्स महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत देशपांडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगत भारतीय संविधान त्याची निर्मिती सांगून संविधानातून लोकशाहीचे मूल्य निर्माण केले जातात. संसदीय शासन पद्धतीचा इतिहासात ब्रिटनच्या राजकीय व्यवस्थेत




संसदीय शासन पद्धती कशा प्रमाणे निर्माण झाली त्यातून मानवी हक्क वद्दलचा संघर्ष सांगताना मानवी अधिकाराची सनद व ह्यूमन राइट्स याबद्दलचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ समीर लिंवारे उपस्थित होते. करताना स्वातंत्र्य समता व न्याय या मूल्यांवर आधारित लोकशाही व्यवस्था निर्माण करुन संविधानाचे महत्व सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ राजू सानप यांनी केले आभार अनुराधा बोंद्रे यांनी केले.


GPS Map Camera
31.26° C
236° SW
Google


GPS Map Camera
31.69° C
178° S
Google


GPS Map Camera
Nashik Division, Maharashtra, India
Loknete Vyankatrao Hiray Marg, HG67+CQC,
Lat 20.561052°
Long 74.514405°
24/2/2025 11:58 AM GMT+05:00
Google



**३६) महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला व वाणिज्य महाविद्यालय येवला, जिल्हा नाशिक,** येथे भारतीय राज्यघटनेच्या ७५ व्या वर्ष पूर्ती निमित्त संविधान गौरव मोहोत्सव अंतर्गत महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये "भारतीय राज्यघटनेची ओळख " या विषयावर दिनांक ०३/००३/२०२५ रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच दिनांक ०५/०३/२०२५ भित्तिपत्रिका सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले व दिनांक०७/०३/२०२५ रोजी प्रश्न मंजूषा स्पर्धेचे (ऑनलाइन) आयोजन करण्यात आले होते वरील सर्व स्पर्धांचे उद्घाटन महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. बी व्ही. गमे सर यांच्या हस्ते करण्यात आले.दिनांक १०/००३/२०२५ रोजी "भारतीय राज्यघटनेची ओळख " या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले, याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून श्री सुखदेव आहेर (मायबोली निवासी कर्णबधिर विद्यालय येवला) यानी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाविषयी व त्यातील वेगवेगळया कलमांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**३७) वि.प्र. समाजाचे श्री स्वामी षट्कोपाचार्यजी महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सायखेडा** येथे भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्ष पूर्ती निमित्त संविधान गौरव महोत्सव फेब्रुवारी २०२५ अंतर्गत 'भारतीय राज्यघटना' या विषयावर त्र्यंबकेश्वर महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉक्टर योगिता जाधव यांनी व्याख्यान दिले.

**३८) महात्मा गांधी विद्यामंदिराचे लोकनेते व्यंकटराव हिरे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पंचवटी, नाशिक-०३**





राज्यशास्त्र विभाग, लोकनेते व्यंकटराव हिरे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी, नाशिक यांनी प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'संविधान गौरव महोत्सव' अंतर्गत भारतीय संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी एक उपक्रम आयोजित केला. राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी नाशिकच्या ग्रामीण आणि शहरी भागात घरोघरी जाऊन संविधानाचे वाटप केले आणि भारतीय संविधानाबद्दल जागरूकता निर्माण केली.

**सी.एच.एम.ई. सोसायटीच्या भोंसला मिलिटरी कॉलेज रामभूमी,**
**नाशिक - ४२२००५ तर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**
















Essay Writing Competition on the occasion of Sandvidhan Gaurav Mahostav.


Latitude: 19.903939
Longitude: 74.06262
Altitude: 570.6±2 m
Accuracy: 10.3 m
Time: 02-28-2025 10:15
Note:संविधान गौरव महोत्सव
Powered by NoteCam

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - ४११००७**




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक, पालक, सर्व सामान्य नागरिक/नागरिकांना भारतीय राज्यघटनेची नव्याने ओळख होणे, नागरी कर्तव्ये व अधिकार या बाबत माहिती व्हावी तसेच राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत अधिकार व कर्तव्यांची माहिती सामान्यांपर्यंत पोहोचविणे या उद्देशाने 'भारतीय राज्यघटनेची ओळख' या विषयावर निबंध स्पर्धा व वत्कृत्व स्पर्धा, भारतीय राज्यघटनेवर प्रश्नमंजुषा, भारतीय राज्यघटनेसंदर्भात पोस्टर/भित्तीपत्रके स्पर्धा, राज्य घटनेच्या विविध बाबी संदर्भात चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदांचे आयोजन तसेच राज्यघटनेविषयीचे अभ्यासक, विषयतज्ञ यांना निमंत्रित करून त्यांची व्याख्याने यासारख्या विविध उपक्रमाचे आयोजन करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात, संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये "संविधान गौरव महोत्सव" साजरा करण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चिंतन आणि भारताना शारवन विकास' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते

सदर राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, माजी राज्यसभा सदस्य यांच्या हस्ते झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या सामाजिक, आर्थिक, राजनैतिक अशा प्रत्येक विचारात शाश्वत विकास दिसून येतो मग तो सामाजिक न्याय असो वा स्वदेशी व्यवसाय असो, याबद्दलचे त्यांचे विचार शाश्वत विकासाचे उदाहरण ठरतात. डॉ. बाबासाहेबांचे कामगारविषयक, जलविषयक धोरण पाहिले तर त्यांची उपयुक्तता आजही पाहायला मिळते. यालाच तर शाश्वत विकास म्हंटले जाते. असे प्रतिपादन माजी राज्यसभा



सदस्य डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चिंतन आणि भारताचा शाश्वत विकास या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी केले.

डॉ. बाबासाहेब आवेडकरांनी मामाजिक न्याय हा विचार सर्वोतोपरी मानला त्यानुसार समाजातील विषमता दूर करण्यासाठी संविधानाद्वारे स्वातंत्र्य, समता, बंधुता या बाबी प्रत्यक्षात आणल्या. यासोयतच प्रत्येक नागरिकाला आर्थिक न्याय मिळावा यासाठी स्थिर केंद्र राज्य संबंध सुयोग्य कर व्यवस्था, राज्याद्वारे उद्योग-व्यवसायांचे संचलन आणि शेतीचे राष्ट्रीयीकरण अशी समाजाभिमुख राज्यव्यवस्था असावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केले कामगारांसाठी किमान वेतन, कामगार संघटनांना मान्यता आणि महिला कामगारांना मातृत्व रजा अशा सामाजिक सुरक्षाविषयक बाबींना डॉ. बाबासाहेब अविडकरांनी प्राधान्य दिले. तसेच जल, विद्युत, खनिजनीति अशा विविध क्षेत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान शाश्वत विकासाचे द्योतक आहे. यावरून आपण म्हणू शकतो की, विकसित भारताची पायाभरणी ही डॉ. बाबासाहेब आबेडकरांनीच केली आहे. असे सर्वकष, दूरगामी विचार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताचे पंतप्रधान झाले असते तर? असा प्रश्न सहस्त्रबुद्धे यांनी विचारला आणि शाश्वत विकासातील डॉ. बाबासाहेव आआंबेडकरांचे योगदान यावेळी अधोरेखित केले.

या परिषदेत पुढे 'डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचे चिंतन आणि महिला सक्षमीकरण' याविषयी केरळ-कोट्टायम येथील महात्मा गांधी विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. बिस्मी गोपालकृष्णन यांनी महिला शिक्षणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले महत्व स्पष्ट केले. महिला शिक्षण हेच महिला प्रगतीला पुढे नेईल, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ठाम मत होते. आजही बेटी बचाओ,

बेटी पढाओ हे धोरण शासनाने अवलविलेले दिसते, याबाबासाहेराची शान्त विचार कळतो, असे डॉ. गोपालकृष्णानाम

यासोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चिंतन आणि शैक्षणिक विकास यो विवा प्रवरा इन्स्टिटयूटचे कुलगुरू डॉ. विष्णू मगरे यांनी डॉ. बाबासाहेब आवेडकरांनी शिक्षण, शिवारु आणि विद्यार्थी या नात्याला कसे महत्त्व दिले होते याविषयी प्रतिपादन केले.

या राष्ट्रीय परिषदेच्या शेवटच्या सत्रात 'डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचे चिंतन आणि पत्रकारिता' या विषयावर बोलताना दैनिक सकाळचे संपादक श्री सम्राट फडणीस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकारितेत केलेल्या प्रयोगांची सोदाहरण माहिती दिली. मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता आणि प्रबुद्ध भारत अशा पाच वर्तमानपत्रात प्रत्येक वेळी बदल स्वीकारून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भूमिका मांडल्या. यातून आज प्रेरणा घेऊन पत्रकारिता ही लोकशिक्षणासाठी केली जावी, असे आवाहन श्री. सम्राट फडणीस यांनी यावेळी केले.

पा राष्ट्रीय परिषदेतेली सावित्रीचाई फुले पुणे विद्यापीठाचे मा कुलगुरू डॉ. मोरा गोसावी, मा. प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, मा. कुलसमिव डॉ. ज्योती भाकरे, माजी प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी, राष्ट्रीय सेवा योजनेचे मा संचालक डॉ. सदानंद भोसले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक मा. डॉ. अभिजीत कुलकर्णी, डॉ बाबासाहेव आंबेडकर अध्यायन प्रमुख डॉ. सुधाकर योकेफोडे, तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख मा. डॉ. हरिश्चंद्र तवले आणि संद्यापन व वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख मा. डॉ. संजय तांबट आदी मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक मा. डॉ. सदानंद भोसले यांनी केले तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. अमित गोगावले यांनी केले तर आभार डॉ. सुधाकर बोकेफोडे यांनी मानले.

## गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स (GIPE)



गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स (GIPE) च्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिटने 'संविधान गौरव महोत्सव' निमित्त एक विशेष कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाचा उद्देश भारतीय संविधानाच्या स्वीकृतीचा सन्मान करणे आणि विद्यार्थी आणि प्राध्यापकांमध्ये त्याच्या तत्त्वांबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. एकूण ५० NSS स्वयंसेवकांनी, प्राध्यापकांसह, या उत्सवात सक्रिय सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन, ज्यामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूलभूत मूल्यांना बळकटी देण्यात आली. वाचनानंतर, एडवोकेट स्वप्ना सहस्त्रबुद्धे यांनी भारताच्या लोकशाहीला आकार देण्यामध्ये संविधानाचे महत्त्व यावर एक अंतर्दृष्टीपूर्ण भाषण दिले. भाषणात मूलभूत हक्क, नागरिकांची कर्तव्ये आणि संवैधानिक मूल्यांचे समर्थन करण्यात तरुणांची भूमिका यासारख्या आवश्यक विषयांवर चर्चा करण्यात आली.

## डेक्कन अभिमत विद्यापीठ



भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी संविधान गौरव महोत्सव निमितडेक्कन  विद्यापीठात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

"हमारा संविधान, हमारा स्वाभिमान" (आपले संविधान, आपला अभिमान) या थीम अंतर्गत डेक्कन कॉलेज, पीजीआरआय, पुणे, आणि डेक्कन कॉलेज, राष्ट्रीय सेवा योजना युनिट (एनएसएस) यांचे मार्फत डॉ. भव शर्मा यांचे "भारताचे संविधानः त्याच्या संस्कृत भाषांतराच्या विशेष संदर्भात" या विषयावर एक विशेष व्याख्यान आयोजित केले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डेक्कन कॉलेजचे कुलगुरू (ए) डॉ. प्रसाद जोशी होते, डेक्कन कॉलेजचे कुलगुरु (ए) डॉ. प्रसाद जोशी यांनी डॉ. भाव शर्मा यांचा सत्कार केला. त्यानंतर, वक्ते डॉ. भाव शर्मा यांनी संविधानाची आणि त्याच्या भाषांतराची गरज

यांची थोडक्यात ओळख करून दिली. त्यांचे अनुभव सांगत, संविधानाची माहिती दिली. कार्यक्रमास कुलसचिव अनिता सोनावणे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समृद्धी रानडे यांनी केले.

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ :** "भारतीय संविधानाची पंच्याहत्तरी" या विषयावर विशेष प्रबोधनपर व्याख्यान ऑनलाईन पद्धतीने गुगल मिट या उपक्रमाच्या माध्यमातून शुक्रवार दि.




२८/०२/२०२५ रोजी दुपारी ३.३० ते ४.०० या कालावधीत टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आले होते.प्राध्यापक डॉ शुभांगी कु-हाडे (अध्यापक -महाविद्यालय, आरण्येश्वर, पुणे) यांनी आपली मांडणी केली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन समाजकार्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रकाश यादव यांनी केले तसचे कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. ओंकार केने कार्यक्रमसमन्वय यांनी केले व कार्यक्रम अधिकारी मा. रोहन बावडेकर यांनी आभारप्रदर्शन केले. या वेळी विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येन उपस्थित होते,

# समारोप

भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त "संविधान गौरव महोत्सव" उत्साहाने साजरा करण्यात आला. २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारतीय राज्यघटनेच्या मसुदा स्विकारण्यात आला. या घटनेला २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली.  २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन २६ जानेवारी, २०२५ रोजी या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्ष पूर्ण झाली. भारतीय राज्यघटनेने भारताला एक सार्वभोम, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले. भारताच्या या ऐतिहात्तिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव साजरा केला गेला संविधानाचे महत्त्व, त्यातील मूल्य आणि त्यांची अंमलबजावणी याबाबत शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये तसेच भावी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी "संविधान गौरव महोत्सव" साजरा करण्यात आला. महाविद्यालयामार्फत आणि विविध विद्यापीठांच्या विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले . या दरम्यान  आयोजित विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

महाराष्ट्र शासन

# “ संविधान गौरव महोत्सव ”




## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण)

## पुणे विभाग, पुणे – ४११००१